# भ. महावीरपूर्व भारतीयसमाज

अडीच हजार वर्षापूर्वीची ही कथा. रक्तरंजित, करुणामय, आत्यंतिक वैभव व पराकोटीचं दारिद्र्य या विषमतेने भारतीयांची मने विषण्ण करणारी. त्यांच्या सुखदु:ख मिश्रणांची ही कहाणी भ. महावीरांच्या जन्माअगोदर अस्तित्वात असलेल्या जैनेतरसमाजाच्या अवस्थेचे हे एक विदारक चित्र.

राजे महाराजे, दरबारी लोक आणि पंडीत वर्ग यांचा एकीकडे सुवर्णकाळ अन् दुसरीकडे सामान्य जनता आणि शूद्रादि लोक यांचा मरणकाल. धनवंत लोक सुख आणि विलासात दंग. इतर प्रजा घाण्याच्या बैलाप्रमाणे अव्याहत पिळली जाणारी.

पण हा घाण्याचा बैल बोलू लागला तर, पददलित लोक जागे झाले तर .. .. उत्तुंग पर्वतावर वज्रपात होताच त्याच्या ठिक-या व्हाव्यात-त्याप्रमाणे उतू जाणारा उन्मत्तपणा  जागृत जनतेपुढे वितळून जाईल.

या काळात राजकीय आणि आर्थिक परिस्थितीच्या त्रासापेक्षा सामाजिक आणि धार्मिक विषमताच भयानक होती. हेच ह्या काळातले मोठे दु:ख. लोक भोळे नि श्रध्दाळू. त्यांचे अज्ञान हे त्यांचे अज्ञानाचे मूळ. मनाची आणि बुध्दीची गुलामगिरी, परिस्थितीची गुलामगिरीचे मानेवर जू.

त्यांच्या निर्बलतेचा सबलांनी फायदा उठवावा. अज्ञानाचा पंडित पुरोहितांनी, पावसाळयात अचानक उगवून आपलं अस्त्वि दाखविणा-या छत्र्याप्रमाणे अनेक वादांचा उगम होऊन त्यांनी  धार्मिक वातावरण गढूळ केले होते. त्यामुळे सामाजिक नि धार्मिक परिस्थिति घनदाट अंधाराप्रमाणे भासत होती, कोट्यावधि ज्ञान सूर्यदेखील हा अंधार नष्ट करण्यास असमर्थ ठरले असते. पुरोहित, क्षत्रिय, वैश्य नि शूद्र या चार जाती समाजात दृढमूल होत्या. एका दृष्टीने हे पुरोहितांचे युग होते असे म्हटले पाहिजे. इतर तिन्ही समाजाच्या नाड्या याच वर्गाच्या हाती होत्या. यज्ञसभारंभ हे या काळाचे वैशिष्ट्य होते. हिंसात्मक यज्ञयाग करणे हाच हिंदूधर्म मानण्यात येत असे. धर्म म्हणजे विलासी पुरोहित  वर्गाला वैभव आणि सत्ता मिळवून देणारे साधन होते. अज्ञानी लोकांना त्यांनी सांगितले -

‘ मोक्ष हवा असेल तर यज्ञात पशूंना बळी द्या. या मर्त्यलोकातील दु:खापासून सुटका हवी असेल तर यज्ञ करा. लोकांच्या कल्याणासाठीच पुरोहितांना यज्ञात त्यांच्याकडून झालेली हिंसा ही हिंसा नव्हे. तो धर्मच होय. ’

असा महान धर्म सामान्य लोकांना कसा मिळवता येणार? मोठमोठया धनवंतांनाच ते शक्य होते. पैशाच्या जोरावर अनेक अनन्वित कृत्ये करुन आयुष्याच्या अखेरीस खर्चिक यज्ञ करुन स्वर्ग मोक्षांची दारे गाठण्याकरीता पुरोहिताकहून मुक्तीचा नि धर्माचा जणू काय पासच ते विकत घेत.  यज्ञ हीच या काळाची देवता बलवान, सर्व शक्तिपरिपूर्ण व सर्व इच्छा पूर्ण करणारी देवता होती.  साध्य व साधनाच्या सरमिसळीत धर्मकल्पनांनी नमवावे लागे.  त्यामुळे त्यांच्या अधार्मिक कृत्यांचा लोकांना वीट आला होता.  ज्याप्रमाणे अग्नि संस्कारयुक्त किंवा संस्कारहीन असला तरी एक महान् देवता आहे.  ज्याप्रमाणे पुरोहित मूर्ख किंवा शहाणा असला तरी महान गुरु आहे.  चारित्रहीन असला तरी तो पूज्यच.  अशी विचारसरणी जाणूनबुजून पसरविण्यात आली होती.  शुद्राचे आचरण पवित्र असले तरी त्याला ज्ञानग्रहण करण्याचा किंवा यज्ञाचा प्रसाद ग्रहण करण्याचा अधिकार नाही.  त्याने धर्मग्रंध वाचू नयेत किंवा ऐकू पण नयेत असे प्रतिबंध लादले होते.  म्हणजे या काळात भारतात शूद्राच्या रुपानेच एक हिडीस अशी गुलामगिरी निर्माण झाली होती.

अशीच नीच वर्तणूक स्त्रियांना मिळत असे.  स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर नि शीलावर घाव घालून आपल्या स्वैरवासना पूर्ण करणाऱ्या पुरुषवर्गाने अबलांच्या रुपाने आणखी एक गुलामगिरी निर्माण केली होती.  या

गुलामगिरीचा पाश सर्व समाजालाच आवळला गेल्याने 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' म्हणून त्यांची हेटाळणी होत असे. पुरुषांच्या स्वामित्वाचे जू मानेवर स्त्रीवर्गास 'असूर्यपश्या' बनून स्वातंत्र्याच्या मोकळया वातावरणापासून अलिप्त रहावे लागे. भोगप्रधान पुरुषसंस्कृतीत स्त्रीवर्गाची याहून अधिक किंमत ती कोणती!

या वेळची धार्मिक परिस्थिति देखील अशीच गोंधळलेली. समीचीन धर्माचा उपदेश करणाऱ्या भगवान पार्श्वनाथास निर्वाणपदास जाऊन अडीचशे वर्षे झाली होती. त्यानंतर त्यांचा उपदेश मागे पडून मिथ्यात्वाचा उद्रेक पुन्हा झाला. या अवधित अनेक सद्विचारांचा लोप झाला. दुष्ट कल्पनांचा फैलाव झाला. स्वत:स तीर्थकर किंवा धर्मोपदेशक समजून धर्माच्या बाबतीत बुध्दिभ्रम करणारा पुरणकाश्यप हा त्या काळाचा एक मोठा धार्मिक होऊन गेला. तो म्हणत असे, ' जे कांही कर्म घडते ते आत्मा करीत नसून आपोआप घडते.' सुख हे अज्ञानात असून मोक्षालाही तेच साधन आहे.

त्याकाळी प्रचलित असलेल्या धार्मिक कल्पनेत सर्वात विक्षिप्त कल्पना म्हणजे चार्वाकाची होय. त्या काळच्या किंवा आजच्या भोगसंस्कृतीचा चार्वाक हा गुरु होऊन गेला असेच म्हणावे लागेल. तो म्हणत असे 'आत्मा वगैरे काही नसून जे काही आहे ते फक्त शरीर आहे. माणसास पुनर्जन्म नाही. तो मेल्यानंतर त्याचे शरीर भस्मसात् होणार आहे. त्या पलिकडे विशेष काही होणार नाही. म्हणून जिवंत असेपर्यंत चैन करा. भोग भोगा व नेहमी इंद्रियांचे चोचले पुरवा.'

इतर अनेक मातापैकी वैदिकांचे मत असे, ' मांसाशन, सुरापन आणि स्वैर आचार यांनी मोक्ष मिळतो. पण ते यज्ञयाग, ईश्वरभक्ती या पायी घडावे.' हयाचा परिणाम म्हणूनच हिंसात्मक-यज्ञयागांचा प्रादुर्भाव झाला. या भौतिक सुखाचा तीव्रलालसे पायीच अनेक गुलामगिरीचा नि दु:खप्रवृत्तींचा जन्म झाला.

याच वेळी राजपूत्र वर्धमानांचा जन्म झाला. जीवनाच्या उच्च भावना लोप पावून आसूरी भावना 'आ' वासून उभ्या होत्या. दानवता आणि हिंसा म्हणजेच मानवता व अहिंसा मानण्याची प्रवृत्ति बळावलेली होती. या विरुध्द बंड करण्याची भावना लोकात निर्माण होऊ पहात होती. पण त्यांना मार्गदर्शक हवा होता. त्यांच्या या तीव्र नि उत्स्फूर्त भावनेतून वर्धमानांच्या रुपाने एक सुयोग्य नेता त्यांना लाभला. हा नेता म्हणजेच वर्धमान महावीर होय. महावीर म्हणजेच जागृत जगातील समतावादी नेता होय. त्या वेळच्या दुष्ट प्रवृत्तीविरुध्द त्यांनी आवाज उठविला. त्यांनी सांगितले-

'खुळचट कल्पनांच्या नादी लागून आचरण करणाऱ्या लोंकानो, स्वर्गाची दारे सदाचाराने वागणाऱ्या सत्पुरुषांकरिता सदोदित उघडी असतात. सदाचाराचे वेड पांघरुन सदोदित पापचिंतनात मग्न असणाऱ्या दुर्जनासाठी मात्र ती बंदच असतात.'

## बाल महावीर

शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाण् कलेकलेने बाळ वर्धमान वाढू लागले. त्याच्या कांतिमान देहावरील शुभ लक्षण् पाहून ज्योतिषांनी सांगितले - आपल्या उदात्त आचरणाने आणि धर्मोपदेशाने विश्वातील अज्ञानांधकार नष्ट करुन समस्त जीवांना धर्माचा नि मानवतेचा दिव्य प्रकाश दाखविणरा महात्मा म्हणून हा बालक ख्याति पावेल.

ज्योतिष्याचे भविष्य ऐक्न सिध्दार्थ् दु:ख्ी झला आणि त्रिशला उदास झाली. वर्धमानानी संसाराचे बंध तोडू नयेत आणि तपस्व्याचा खडतर मार्ग अनुसरु नये. याकरिता सिध्दार्थाने प्रथमपासूनच त्याची खूप काळजी घेतली. वैभवपूर्ण वातावरणात त्याचे लालनपालन होऊ लागले. राहण्यास भव्य प्रासाद, आसपास सुंदर उपवने, मन मोहून जाईल असे प्रसन्न वातावरण यांची खास सोय सिध्दार्थानी आपल्या लाडक्या वर्धमानाकरिता केली होती.

बाळ वर्धमान म्हणजे राजा सिध्दार्थाच्या ज्ञातृकुलाचा कुलदीपकच. तो सदोदित असाच तेवत राहावा आणि त्याला वैराग्याचा वारा कधीच लागू नये, असे सिध्दार्थ आणि त्रिशलेला वाटे. वर्धमान शरीराने अत्यंत बलवान व तेजस्वी होता. मुख कांतिमान नि आकर्षक परंतु त्याच्या बलिष्ठ देहात कोमल भावनांने ओत:प्रोत भरलेले हळुवार अंत:करण होते. त्यातून सदोदित उदात्त विचारच बाहेर पडत. लहानपणापासून बाळ

वर्धमान तीव्र बुध्दीचा म्हणूनच प्रसिध्द होता. त्याची प्रतिभा अत्यंत तेजस्वी होती. मोठमोठे विद्वान लोकही त्याच्या ज्ञानाने दिपून जात. वर्धमान म्हण्जे त्रिशला राणीचा जीव की प्राण ! आपल्या दृष्टीपुढून क्षणभरही त्यानी हलू नये असे तिला वाटे. मंदिरात पूजेला जाताना ती त्याला बरोबर नेई. तेथील ध्यानस्थ मूर्तीची प्रसन्न मुद्रा पाहून वर्धमान मोहित होई. तिच्या सहवासाने तो व्रती, विवेकी व विनयी बनला होता. वैभवपूर्ण वातावरणाचा त्याच्यावर विपरीत परिणाम होऊन तो दिवसेन दिवस अध्किच विरागी बनू लागला. आपले जीवन साधू नि संयमी बनवू लागला. वयाच्या आठव्या वर्षीच व्रतांकडे त्याची स्वाभविक प्रवृत्ति होऊन तो व्रती बनला.

एकदा संजय आणि विजय नावाच्या दोन मुनींना तत्वात शंका आली. कुंडपुरीच्या राजप्रासादाजवळून ते दोघे जात असता बाळ वर्धमानाला त्यांनी पाहिले. त्याचबरोबर त्यांची शंका आपोआप दूर झाली. त्यांची मति सन्मति बनली. म्हणून त्यांनी बर्धमानाचे सन्मति नाव ठेवले.

अनेक वर्षे गेली. वर्धमान आता मोठा झाला आहे. तो खेळतो आहे आपल्या सवंगड्याबरोबर. तो खेळण्यात निर्भय आहे, चपळ आहे. न त्याला कशाची भीती आहे न काळजी. त्याच्या पराक्रमाची कथा त्याच्या निर्भयतेचे द्योतक आहे.

एकदा राजपुत्र वर्धमान खेळण्यासाठी आपल्या मित्राबरोबर उपवनात गेला होता. सकाळची प्रशांत वेळ. पावसाळा नुकताच संपला होता. सर्वत्र रम्य हिरवीगार वनश्री पसरली होती. बागेत अनेक रंगाची फुले उमलली होती. त्यांच्या सुवासानी आसमंत आल्हाददायक भासत होता. वर्धमानाचा खेळ रंगला होता सुरपारंब्याचा खेळ तो. एका मोठ्या वृक्षाखाली एक वर्तुळ काढण्यात आले होते. त्यात दीड हाताची काठी होती. सर्व मुले झाडावर बसली होती. विजयी गडी खाली येऊन ती काठी आपल्या पाया-खालून लांबवर फेकून देई. ज्याच्यावर डाव येई - तो गडी तो काठी आणून वर्तुळात ठेवी नि झाडावरील गड्यांना शिवण्याचा प्रयत्न करी. हा खेळ रंगात आला होता. पण मधून एका खेळाडून मारलेल्या किंकाळीने सर्वजण हादरुन गेले. घाबरलेल्या खेळाडूंनी खाली पाहिले. एक भ्ला मोठा सर्प बृक्षाला विळख घालून तेथील वर्तुळात आपला फणा वर करुन फुसफुसत होता. परंतु वर्धमान घाबरला नाही. त्याने आपल्या मित्रांना धीर दिला. मोठ्या शिताफीने सर्पाच्या फण्यावर उडी मारुन त्यावर तो उभा राहिला. त्याच्या वज्रमयी देहाने सर्पाचा उन्नत फणा भुईसपाट झाला. त्याचे गर्व हरण झाले. परंतु तितक्यात त्या सर्पाचे दिव्य देहधारी पुरुषाकृतीत रुपांतर झालेले पाहताच वर्धमानाला आश्चर्याचा धक्का बसला. तेवढ्यात तो दिव्य देहधारी पुरुष म्हणाला.

हे प्रभो ! आपल्या खेळात विघ्न आणून आपल्या सोबत्यांना त्रास दिल्याबद्दल मला क्षमा करा. मी सर्प नसून स्वर्गातील देव आहे. माझे नाव संगम आहे. इंद्राने स्वर्गात केलेल्या आपल्या पराक्रमाचे वर्णन ऐकून त्याची परीक्षा पाहण्यासाठी मी आलो आहे. आपण शूर आहात. वीर आहात. पराक्रमी आहात. आपल्या अचाट सामर्थ्याची मला पूरेपूर कल्पना आहे. आपण नुसतेच वीर नसून महावीर आहात - एवढे बोलून तो देव अंतर्धान पावला.

भारताच्या पूर्वेकडील राज्ये, महावीराच्या काळी समर्थ होती. मगध आणि विदेह ही दोन राज्ये तर अत्यंत सामर्थ्यशाली होती. मगधाची राजधानी राजगृह असून विदेहाची राजधानी वैशाली होती. ही दोन्ही राज्ये सध्याच्या बिहार प्रांतात होती. वैशाली नगरीचा प्राचीन इतिहास गौरवास्पद आहे. राजा चेटक हा वैशालीचा अधिनायक असून तो लिच्छवी वंशाचा होता. या वंशाची शासनप्रणाली गणतंत्रात्मक होती. राज्यातील निरनिराळ्या विभागांची शासन व्यवस्था गणराजाकडून चालत असे. प्रजेने निवडलेल्या निवडक प्रतिनिधींना गण असे म्हणत. त्यांच्याकडून चाललेल्या कारभाराला गणतांत्रिक पध्दती असे नाव होते.

वैशालीपती राजा चेटक हा त्या प्रदेशातील सर्व गणराजांचा अधिनायक होता. राजा सिध्दार्थ हा कुंडपुरीचा गणराजा होता. त्याच्या कुळाचे नाव ज्ञात असे होते. राजा चेटकाने आपली ज्येष्ठ मुलगी त्रिशला सिध्दार्थास दिली होती. राजा सिध्दार्थ आणि वैशालीपती चेटक हे दोघेही जैन धर्मीय असून क्षत्रिय होते. सत्तेनी चेटक सिध्दार्थापेक्षा वरचढ होता. पण त्याचे कुल आणि न्यायनिपुणता यामुळे चेटक राजाला आपली मुलगी सिध्दार्थाला देण्यात धन्यताच वाटली. आपल्या गुणांनी सर्वामध्ये प्रिय झालेली प्रियकारिण्ी त्रिशला आणि पराक्रमी सिध्दार्थ यांचा मधुर संगम सर्वांना सुखकारक वाटला असेल यात काय आश्चर्य ! अन् महावीरासारखा जगदुध्दारक पुत्रांना जन्म दिल्याने त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली.

## युवराज महावीर

युवराज महावीरांनी आता तारुण्यात प्रवेश केला. सुडौल बांधा नि भक्कम शरीरयष्टी यामुळे त्याचे तारुण्य उठावदार दिसे. वाढत्या वयाबरोबरच त्यांची चिंतनशीलता नि वैराग्यही दिवसेन दिवस वृध्दिंगत होऊ लागले. यामुळे राजाराणी अधिकच दु:खी होऊ लागली. आपल्या प्रेमाचे पाश तोडून महावीर केव्हा निघून जाईल याचा त्यांना भरवसा वाटेना. आपल्या भोवती निर्माण केलेल्या सुखाचा आभासाचा त्याग करावा नि जगाचे प्रत्यक्ष निरीक्षण करुन त्याविषयी आपले मत बनवावे असे महावीराला वाटे. सागराच्या मध्यभागी गेलेल्या कोळ्याला सभोवती पाणीच पाणी दिसते तसे जगात सर्वत्र अनेक रुपानी दु:खे भरलेली आहेत असे महावीरांना वाटू लागले. जगातील दु:खे दूर करावयाची असतील तर ह्या कृत्रिम सुखाच्या वलयातून बाहेर पडलेच पाहिजे असा त्यांनी निश्चय केला. काठोकाठ दु:खांनी भरलेल्या समाजाचे रक्षण, त्यांना योग्य मार्गदर्शन व खोट्या मोहमयी दुनियेतून त्यांची सुटका व सन्मार्ग साधनेचे मार्गदर्शन इत्यादींची त्यांना आवश्यकता वाटू लागली.

आपल्या तरुण वयात पाहिलेल्या दु:खद दृष्यांनी महावीरांच्या जीवनात आमूलाग्र क्रांती झाली. जगास दु:खमुक्त कसे करता येईल हाच विचार त्यांच्या मनात घोळू लागला. रात्रंदिवस या विचाराने ते बेचैन होत. त्यांची ही स्थिती पाहून सिध्दार्थ आणि त्रिशला यांचे अंत:करण तिळतिळ तुटे. परंतु महावीर मात्र पिंजऱ्यात अडकलेल्या स्वातंत्रेच्छु पक्षाप्रमाणे सर्व प्रकारचा मोहबंध तोडू इच्छित होता.

एकदा महावीर आपल्या राजप्रसादावर एकटाच विचार करीत बसला होता. पाण्यात राहून अलग अस्तित्व दाखविणाऱ्या कमलाप्रमाणे महावीराचे (या जगात) जीवन होते. खाणे, पिणे, खेळणे, क्रीडा करणे या साऱ्या गोष्टी तो करीत असे पण त्यात त्याचे मन रमत नसे. आपण सुखाचे आयुष्य भोगतो. पण जगात ह्या उलट स्थिती आहे.

जग म्हणजे एक रंगमंचक आहे. प्रत्येक प्राणी त्या रंगमंचावरील एकेक पात्र घेऊन वावरतो आहे. ते सत्य नाही. ते सोंग आहे. त्याला मिळालेले प्रत्येक पात्र त्याच्या कृत कर्मामुळे रस्त्यातल्या चढ - उताराप्रमाणे मिळाले आहे. कुणाला दु:खी कुणाला सुखी - गरीब - श्रीमंत ... सर्व प्रकारचे.

## पूर्व भवस्मरण (जन्ममरण फेऱ्याची सुटका)

गत आयुष्यात महावीर एकदा मधुवनात पुरुरवा भिल्ल म्हणून जन्मास आला होता. राकट शरीराचा, दणकट बाहूंचा नि कठोर हृदयाचा पुरुरवा म्हणजे साक्षात् यम होता. मधुवनातल्या मोहक प्रदेशात स्वच्छंदपणे बागडणाऱ्या प्राण्यांची शिकार करुन त्यावर त्याची बायको व तो जगत असत.

एकदा त्याच्या झोपडी वरुन एक प्राणी जात आहे असा त्याला भास झाला. तात्काळ त्याने आपल्या हातात धनुष्य घेतले नि त्यावर बाण चढवून भक्ष्याच्या दिशेने तो पावित्र्यात अभा राहिला. धनुष्यातून बाण सुटणार, इतक्यात त्याची बायको धावतच तेथे आली आणि ओरडून म्हणाली.

'थांबा, थांबा, हरिणाची शिकार समजून आज तुम्ही मोठे पातक कराल. ते हरीण नाही. आपल्या मधूवनात तपश्चर्या करणारे ते सागरसेन मुनी आहेत. '

हे ऐकताच पुरुरवाच्या हातातील धनुष्य आपोआप खाली गळून पडले. त्याने वळून आपल्या बायकोकडे पाहिले तिच्या मोहक नजरेला नजर भिडवीत तो म्हणाला -

'प्रिये, आज तू नसतीस तर माझ्या हातून महान पातक घडले असते. आपल्या मधुवनात विहार करणाऱ्या सागरसेन मुनींचा मी वध केला असता. तू मला एका मोठ्या पातकातून वाचवलेस. '

पुरुरवा आणि त्याची बायको सागरसेन मुनीकडे गेले. मुनींना नमस्कार करताच ते म्हणाले,

स्वत: जीवंत राहण्याकरिता दुसऱ्यांचा प्राण घेणे मोठा अधर्म आहे. ह्यामुळे तर अनंत भवातून अनेक रुपे धारण करुन तुम्ही असे भटकत आहात. दुसऱ्याचा वध करण्यासाठी तुमच्या शक्तीचा अपव्यय करु नका. संकटग्रस्त प्राण्यावर तुम्ही दया दाखविली तर तुमच्या जन्माजन्माचे कल्याण होईल.

सागरसेन मुनींच्या धर्मोपदेशाने पुरुरवा शुध्दीवर आला त्याच्या डोळ्यातून आसवे वाहू लागली. हुंदके देत देत मुनींना नमस्कार करुन तो म्हणाला.

महाराज चुकले माझे, यापुढे मी कोणत्याही प्राण्याची हत्या करणार नाही.

ही गोष्ट आठवताच महावीर अधिक गंभीर झाला. एकूण आपण भिल्लही होता तर जन्म मरणाच्या अनंत फेऱ्यातून आपण आणखी कोणती रुपं घेतली असतील. महावीरास आणखी एक कथा आठवली.

प्रथम तीर्थंकर वृषभनाथ यांच्या वेळची गोष्ट ही. त्यांना चक्रवर्ती भरत बाहुबली अशी दोन मुले होती. भरत चक्रवर्तीला मरीचि नावाचा मुलगा होता.

वृषभनाथ राजवैभव सोडून अरण्यात निघून गेले. त्याचा कोवळ्या मरीचीवर फार परिणाम झाला. जगाच्या अशाश्वतेची त्यालाही कल्पना आली. म्हणून त्यानेही वृषभनाथाबरोबर मुनिदीक्षा घेतली. वृषभनाथांनी आपल्या दिव्य ज्ञानाने ओळख्ले की, हाच पुढे महावीर नांवाचा चोवीसावा तीर्थंकर होणार आहे. ही गोष्ट समजताच मरीचीस फार गर्व झाला. मुनिदीक्षा आचरण्यास अत्यंत कठीण आहे याची जाणीव होताच तो धर्मबाह्य कृत्ये करु लागला. त्यामुळे मरणानंतर तो कुटिल देव झाला.

पुढे कधी स्वर्गात, कधी नरकात, कधी तिर्यक योनीत त्याने जन्म घेतला. एकदा स्थूलागार गावात भारव्दाज ब्राम्हणाच्या घरी पुष्पमित्र म्हणून तो जन्मला. पुढे तो अग्निसह नावाचा ब्राम्हण झाला. अशा अनेक जन्मात त्याला अनेकदा सुख - दुखं भोगावी लागली.

एकदा हा जीव राजग्रह नगरात विश्वभूती राजाच्या पोटी विश्वनंदी नांवाने जन्मला. विश्वनंदीची त्यावेळची एक मजेशीर कथा आहे. विश्वभूतीस विशाखभूती नावाचा एक भाऊ होता. आपल्या वृध्दापकाळी विशाखभूतीस राज्य देऊन व विश्वनंदीस युव राजपद देऊन तपश्चर्या करण्यासाठी तो निघून गेला.

विशाखभूतीस विशाखनंदी नावाचा मुलगा होता. त्याला युवराज विश्वनंदीविषयी मत्सर वाटू लागला. म्हणून तो त्यास पाण्यात पाहू लागला. एकदा तर विशाखनंदीने त्याच्याबरोबर युध्दही केले. पण त्याचाच पराभव झाला. पण विजयी विश्वनंदीस यामुळे गर्व न चढता वैराग्य निर्माण झाले. य:कश्चित राज्याच्या तुकड्यासाठी आपल्यातच भांडणे व्हावीत हे त्यास आवडले नाही. त्याने ताबडतोब राज्यावर लाथ मारली आणि अरण्यात जाऊन तपश्चर्या आरंभिली. कांही दिवसांनी मुनी विश्वनंदी गावात आले. ते रस्त्याने

जात असता गायीच्या धक्क्याने ते खाली कोलमडून पडले. हे पाहताच जवळच असलेला विशाख्नंदी मोठमोठ्याने हसू लागला. त्यामुळे विश्वनंदीस अतिशय संताप आला. तीव्र रागाच्या भरात तो अद्वातद्वा बोलू लागला आणि त्यातच त्याचा अंत झाला.

ही गोष्ट आठवताच महावीराच्या अन्तर्मनात खळबळ उडाली. मानवी देहाच्या क्षणभंगुरतेविषयीच्या विचारांनी त्याचे मन कंपित झाले.

मानवी देह म्हणजे सरोवरातील कमल पत्रावर मोत्याच्या वैभवाने चमकणाऱ्या जलबिंदूप्रमाणे क्षणभंगूर आहे. वाऱ्याच्या झोतासरशी चमकणारा तो जलबिंदू क्षणार्धात जलाशयात विलीन व्हावा, त्याप्रमाणे आशेवर अवलंबून असलेला हा मानवी देह काळ सरोवरात केव्हाही विलीन होईल. तप्त काच पाण्याच्या स्पर्शाने तडकून जावी त्याप्रमाणे हा देह लहानशा आपत्तीनेही मृत्तिकेत मिसळून जाईल.

पूर्व भवात महावीर एकदा वराह पर्वतात सिंह होऊन जन्मला. तेथल्या वनचरांचा तो सम्राटच. विलाश आयाळ उभी करुन आणि शेपूट वर धरुन गर्जना करीत तो फिरु लागला की सारे प्राणी भयभीत होत. एकदा अमितगुण व अजितंजय नामक दोन मुनी त्याच्या पुढून जात होते तो त्यावेळी मारलेल्या हरिणाचे मांस खाण्यात मग्न होता. पुढील भवामध्ये हा जीव तीर्थंकर भ. महावीर होणार असल्याने मुनींनी त्याला उपदेश केला.

सिंहा ! वा ! तुझा पराक्रम अचाट आहे. पण गेल्या अनंत भवात त्याचा तू दुरुपयोग केल्याने या भवात हिंसक प्राणी म्हणून जन्मला आहेस. नरकादी अनेक गती तुला आजपर्यंत लाभल्या आहेत. आता तरी हिंसक भाव सोडून दे आणि आत्म कल्याणाचा अहिंसक मार्ग स्वीकार.

मुनीच्या उपदेशाने त्या क्षणापासून त्याच्या जीवनात परिवर्तन झाले. आजन्म मांसाहाराचा त्याने तयाग केला. शेवटी अत्यंत शांत चित्ताने नि पवित्र विचाराने त्याने मरणाला मिठी मारली. त्यामुळे तो स्वर्गात हरिध्वज नामक देव झाला. पुढे कधी मानव कधी देव इत्यादी अनेक जन्म घेऊन महावीराच्या जीवाने संसारात भ्रमण केले.

एकदा तो श्वेतपात्रा नावाच्या नगरात राजा नंदवर्धन व राणी वीरवती यांच्या पोटी जन्मला. त्याचे नाव नंदन असे ठेवण्यात आले. पिहितास्त्रव मुनीजवळ आपल्या पूर्वजन्माच्या विचित्र कथा ऐकून त्याने मुनिदीक्षा घेतली. दर्शनविशुध्दि, विनयसंपन्नता, श्लिव्रतांविषयी अनतिचार इत्यादी षोडश पवित्र भावनांचे निरंतर चिंतन केल्याने त्यास तीर्थंकर कर्माचा बंध पडला. मृत्यूनंतर अच्युत स्वर्गातील पुष्पोत्तर विमानात तो इंद्र झाला. त्यानंतर कुंडपुरीचा राजा सिध्दार्थ आणि राणी त्रिशला यांच्या पोटी त्याचा जन्म झाला. हा जीव म्हणजेच महावीर.

पूर्व भवातल्या आपल्या कथांच्या स्मरणानी आणि विश्वनिरीक्षणाच्या वेळी पाहिलेल्या दृश्यांनी महावीर दिवसेन दिवस फारच गंभीर झाला. ह्या सर्व गोष्टींचा कायमचा परिहार करायचा असेल तर आत्मशुध्दीचा पवित्र मार्गच अनुसरला पाहिजे. मोहाच्या फापट पसाऱ्यातून बाहेर पडलेच पाहिजे. जन्म मरणाच्या फेऱ्यातून सुटका करुन घेतलीच पाहिजे.

**वैराग्याची ओढ**

आयुष्याची तीस वर्ष संपून गेली. महावीराचा आत्मा सांसारिक सुखापासून विरक्त होऊ लागला. ह्या संसारापलीकडील सुखाची त्याची धडपड सुरु झाली.

महावीर युवराज होता. ऐश्वर्याचा स्वामी. भोगविलासाच्या साधनांची त्याच्या भोवती विपुलता होती. मातेची समता नि पित्याचे प्रेम जनतेची विनम्रता कारंजाप्रमाणे होऊन त्याच्यावर वर्षाव करीत होती. पण महावीर आपल्या वैराग्य पथावर निश्चल होता. एकीकडे आई-वडिलांच्या प्रेमाची बंधने त्याला मोहाकडे खेचीत होती तर दुसरीकडे त्याच्या मनातले वैराग्य आंतरिक ओढ निर्माण करीत होते.

प्रेमाची बंधने जो जो तोडू पहावीत तो तो ती आवळली जाऊ लागतात. म्हणूनच तारुण्याच्या उंबरठ्यावर सुरु झालेले वैराग्य वयाच्या तीसाव्या वर्षापर्यंत तसेच घुटमळत होते. एके दिवशी त्रिशला राणी महावीराजवळ आली. आपल्या विचारमग्न लाडक्या महावीराच्या पाठीवरुन ममतेने हात फिरवित म्हणाली -

'बाळ वर्धमान, माझी एक गोष्ट ऐकशील ? '

'आई, तुझा लाडका वर्धमान कधी तुझ्या आज्ञेबाहेर गेला आहे होय ? '

'नाही बाळ, माझा लाडका वर्धमान माझ्या आज्ञेबाहेर कधीच गेला नाही. पण तुझी विचारमग्न मूर्ती पाहून माझ्या हृदयात कालवाकालव होते. ज्ञाति कुलाचा तू एकुलता एक आधार आपले कुल असेच वृध्दिंगत व्हावे असे तुला वाटत नाही काय ? '

'हा ! हा ! अवश्य व्हायला हवे. ज्ञातिकुल सदोदित विकसित होणारच. त्याची कीर्ती त्रिखंडात पसरणारच ! '

'पण त्याची तर मला काळजी वाटते. तुझे दोनाचे चार हात झाले, अन् ज्ञातीकुलाला शोभेल अशी सून घरात आली म्हणजे माझे दु:ख हलके होईल.

महावीर एकदम आश्चर्यचकित झाले. त्यांची शांत मुद्रा बदलली, ज्या बंधनातून बाहेर पडण्याचा ते विचार करीत होते, ते बंधन त्यांच्या भोवती आवळले जात होते. त्याच्यासारख्या दृढसंकल्पी जीवाला मातेच्या ममतेचा पाश तोडणे जड वाटू लागले. पण मातेची ममता असली म्हणून काय झाले ? ते एक बंधनच होते. बेडी ही लोखंडाची काय किंवा सुवर्णाची काय, परिणामाच्या दृष्टिने सारखीच. थोडा वेळ विचार करुन महावीर म्हणाला -

'आई, तुझे विशुध्द प्रेम मला मान्यच आहे. पण त्यावर मोह व ममत्वाची पुटे चढली म्हणजे मला त्याचा स्वीकार करणे अशक्य होऊ लागते. अगं, ज्ञातिकुलाची कीर्ती पसरविण्याचा हा खरा मार्ग नव्हे. आतापर्यंत अनेक राजे या कुलात जन्मले, पण ज्ञातिकुलाची कीर्ती वाढविणे त्यांच्या हातात नव्हते ! आई, ह्या बंधनात तू मला गुंतवू नयेस अशी माझी इच्छा आहे. '

## विलासितेवर वैराग्याचा विजय (दीक्षा कल्याणक)

मार्गशीर्ष कृष्ण दशमीचा दिवस. वर्धमानाच्या जन्मदिवशी हर्षभरित झालेली कुंडपुरी आज उदास नि दु:खी भासत होती. सिध्दार्थाच्या प्रासादासमोर असंख्य लोक जमून महावीरांना अभिवादन करुन दु:खित मनाने त्यांना आपल्या प्रजेचा निरोप घेत होते. तीस वर्षाचा सुख - भोगाचा काळ व्यतीत केलेला. शेवटी त्याचा त्याग करुन महावीर आज आपल्या प्रजेचा निरोज घेत होते. कुंडपुरीचे राज्य, घरदार नि प्रेमळ प्रजा यांना सोडून आत्मसुखाच्या शोधार्थ ते चालले होते. पूर्णत्वाच्या दिश्ेने ते आता वाटचाल करणार होते. महावीर तीन ज्ञानाचे धारक होते. तेव्हा अरण्यात जाऊन तप करण्याची खरे म्हणजे काय आवश्यकता होती ?

त्यांना अजूनही केवलज्ञान झाले नव्हते. ज्ञानाची परिसीमा त्यांनी अजून गाठली नव्हती. आत्म सुधाराचा मार्ग त्यांना अजून लाभला नव्हता. क्रोध, मान, माया, लोभ इ. मानवी दुर्बल विकारावर त्यांना पूर्ण विजय मिळवायचा होता. म्हणून एकदम विद्वत्तेचा आव आणून ते दुसऱ्यांना उपदेश करण्याच्या भानगडीत पडले नाहीत. त्यांची खात्री होती की, आधी आत्मिक ज्ञान झाल्याशिवाय त्याचा प्रकाश दुसऱ्यांना देता येणार नाही. **स्वत:च्या दुर्बलतेवर विजय मिळविल्याशिवाय इतरांची दुर्बलता घालविता येणार नाही.** आधी

आत्मकल्याण साधल्याशिवाय परकल्याण साधणे अशक्य आहे. आधी आडात पाणी हवे नंतरच ते पोहऱ्यात येणार. महावीरांनी राज्य सोडण्याच्या आधी राजवाड्यातील संपूर्ण धन सर्व गोरगरीबांना वाटून दिले. आज सर्व प्रकारचा मोहजाल दूर सारून ते राजवाड्याबाहेर पडले.

महावीरांच्या मनातील हा निर्धार देवांना समजताच ते खाली आहे. महावीरांची पूजा करुन त्यांनी त्यांना वंदन केले. राजवाड्यातून बाहेर पडून महावीर सात पावले पुढे गेल्यावर इन्द्र पुढे आला. आपल्या रत्नजडित 'चंद्रप्रभा' पालखील बसण्याची महावीरांना त्याने विनंती केली. साश्रुपूर्ण नयनांनी निरोप देणाऱ्या प्रजेकडे महावीरांनी पाहिले. त्यांचे कुसुम सद्रश्य मन आज वज्राहूनही कठोर बनले होते. आपल्यात थोडीही चलबिचलता निर्माण न होऊ देता ते पालखील जाऊन बसले. देवांनी पालखी उचलली. काही अंतर चालून जाताच पालखीमागून जाणारे लोक परतले.

देवांनी पालखी खंडवनात आणली. इंद्राच्या हाताचा आधर घेत महावीर पालखीतून खाली उतरले. खंडवनातील वनश्री महावीरांच्या आगमनाने हर्षून गेली. तिने सर्व ऋतूत फुलणारी फुलं नि फळं धारण करुन महावीरांचे स्वागत केले. महावीरांनी आपल्या मस्तकावरील रत्नमय मुकूट जमिनीवर काढून ठेवला. गळ्यातील अनेक रत्नहार धरतीवर ठेविले. आपल्या अंगावरील दिव्य वस्त्रे काढून टाकली. महावीरांचे वैराग्य पाहून जवळच्या देवदेवींची अंत:करणे भरुन आली. महावीर आता पूर्ण दिगंबर झाले. मार्गशीर्ष वद्य दशमीस एका मोठ्या वृक्षाखालील स्फटिक मण्याच्या शिलेवर महावीर विराजमान झाले. त्यांनी आपले मुख उत्तर दिशेस केले. कर्मातीत सिध्द भगवंतांना त्यांनी नमस्कार केला. नंतर त्यांचे हात सहज आपल्या डोक्याकडे गेले. युवराजावस्थेत अनेक युवतींना भुरळ पाडणारे त्यांचे केस वाऱ्याने भुरभुरत होते. या दिगंबरावस्थेत जगाला मोह पाडणारे एकच वैभव अजून त्यांच्याजवळ होते. ते म्हणजे त्यांचे कुरळे केस. महावीरांनी मनात म्हटले, 'हा मोह तरी का असावा जवळ ? मोहाचा अणु एवढा अंश दुर्लक्षित राहिल्यास विशालस्वरुप धारण करु शकतो. ' तात्काळ त्यांनी आपल्या दोन्ही हातानी डोक्यावरील केस उपटून टाकले. या विधीस 'केशलोच' असे म्हणतात.

यानंतर महावीर मौनस्थ राहून पूर्ण विकासाचा मार्ग शोधण्यात मग्न झाले. महावीर पराक्रमाने नावाप्रमाणे शूर - वीर होते. मनुष्य आपल्या पराक्रमाने जग जिंकू शकेल पण आपल्या आत्मिक विकारावर क्रोध, मान, माया, लोभ या वासनावर पूर्ण विजय मिळवणे त्याला सहजासहजी शक्य नाही. महावीर त्या अशक्य गोष्टीचीच आजपासून साधना करु लागले.

### अखंड साधना

महावीरांनी मुनिदीक्षा धारण केली. तेव्हांपासूनच त्यांच्या अखंड साधनेस प्रारंभ झाला. त्यांना बुध्दि, विक्रिया, तप, बल, औषध, रस व क्षेत्र या सात ऋध्दि सिध्दि प्राप्त झाल्या. त्यानंतर लवकरच मन: पर्ययज्ञान ( आपल्या व दुसऱ्याच्या मनातले व मागच्या व पुढच्या भवातले ज्ञान होणे ) प्राप्त झाले. जंगलात राहून आत्मविकारांवर विजय मिळविणे ही कांही सोपी गोष्ट नव्हती. आत्मचिंतनात सतत मग्न राहून विश्वकल्याणाच्या भरीव योजनांचे उपया शोधणे हे लोकोत्तर कार्य होते. पण स्वपर उन्नतीचे महान ध्येय हस्तगत करण्याकरिता पराक्रमी महावीरांनाही खडतर तपश्चर्येचा अवलंब करावा लागला. हिंस्त्र श्वापदांनी गजबजलेल्या अरण्यात त्यांनी शांतपणे चिंतवन चालू ठेवले. त्यांच्या साधनेत हिंस्त्र प्राण्यांचा अडथळा विशेष परिणाम करु शकला नाही. थंडी, ऊन, पाऊस, वारा या परिषहांची त्यांनी मुळीच पर्वा केली नाही. सोसाट्याच्या वाऱ्यानी प्रचंड वृक्ष उन्मळून पडत. पण महावीर मात्र अचलच ! कधी मेघांचा भयंकर गडगडाट होई. आरण्यातील सारे प्राणी भयभीत होऊन सैरावैरा धावत ! पण महावीर मात्र मेरुप्रमाणे स्थिर राहात. तळपत्या सूर्याने पाने करपून जात. पण महावीरांच्या साधनेत खंड पडला नाही. तपश्चर्येचे फळ म्हणून त्यांना प्राप्त झालेल्या ऋध्दींनी त्यांना कसलाही त्रास झाला नाही. याचवेळी त्यांना अनेक उपसर्ग झाले. त्यांच्या तपश्चर्येचा भंग करुन आत्मसाधनेच्या मार्गापासून त्यांना च्युत करण्याचे अनेक प्रयत्न झाले. पण भ्. महावीर

शांतच. त्यांना अशा उपसर्गावर तर विजय मिळवायचा होता. उपसर्ग करणाऱ्याविषयी त्यांच्या मनात कोणताही वैरभाव नव्हता. त्यांनी एक गोष्ट जाणली होती -

'' सुख देणारे आणि उपसर्गादि रुपाने दु:ख देणारे दुसरे कुणीच नसतात. आपल्या कर्माचीच ती फळं आहेत. मित्रत्व आणि शत्रुत्व हे भाव व्यर्थ होत. सन्मार्गावर चालणारा आपला आत्माच आपला मित्र आणि कुमार्गाचा अवलंब करणारा आपला आत्माच आपला शत्रु आहे. ''

एकदा भगवान महावीर 'अतिमुक्तक ' नावाच्या स्मशानात रात्री ध्यानस्थ होते. सर्वत्र अंधार पसरला होता. पण महावीर आत्मज्योतीच्या प्रकाशात कर्ममुक्तीचे साधन शोधीत होते. आत्मानंदात लीन होते. पण तेथे राहात असलेल्या भव नावाच्या रुद्रास ही गोष्ट आवडली नाही. त्याला भयंकर राग आला. महावीरांना आपल्या ध्येयापासून च्युत करण्याची आसुरी भावना त्याच्या मनात थयथयाट करु लागली. तो महावीराजवळ आला. आपल्या विद्येच्या सामर्थ्याने त्याने अनेक रुपे घेतली. आक्राळ-विक्राळ रुप घेऊन व मोठ्याने आवाज काढून तो महावीरास भीति दाखवू लागला. पण महावीर ध्रुव ताऱ्याप्रमाणे आपल्या ध्यानात अचल राहिले. रुद्र खिन्न झाला पण पुन्हा त्याच्या डोळ्यात क्रोध उफाळू लागला. क्रोधाने अंध झालेल्या त्याला आपल्या कोणत्याच कृत्याबद्दल खंत वाटेनाशी झाली. तो महावीरांना पुन्हा मानवी देह परंतु पशूंची डोकी धारण करुन त्याने महावीरांचा छळ केला. भयानक श्वापदांची रुपं घेऊन भीति घातली. त्यांचे चित्त विचलित करण्याचाही प्रयत्न केला. पण महावीरांनी त्या गोष्टींना दाद दिली नाही. रुद्राचे सारे प्रयत्न व्यर्थ ठरले. शेवटी त्याला पश्चात्ताप झाला. आपल्या नीच कृत्याचा त्याला मनस्वी राग आला. तो महावीरास म्हणला,

'भगवन् या अज्ञ जीवाला क्षमा करा. आपणासारख्या महान् तपस्व्यांना मी उपसर्ग दिला. जन्मोजन्मीचं पाप मी संचित केलं. भगवन् ! आपण दयार्द्र अंत:करणाने मला क्षमा करा. ' उपसर्गा नंतर त्याने व पार्वतीने भगवानाची स्तुती करुन त्यांचे नांव महति - महावीर ठेवले.

भ. महावीरांची तपश्चर्या संपली. अग्नीतून तावून सुलाखून निघालेल्या सुवर्णाप्रमाणं प्राप्त उपसगा्रतून महावीर पार पडले होते. त्यांनी डोळे उघडले. समोर रुद्र नतमस्तक होऊन अश्रु ढाळीत असल्याचे त्यांना दिसले. महावीर मात्र मौन होते. पण त्यांच्या हसऱ्या चेहऱ्याकडे पाहून काय समजायचे ते रुद्र समजून गेला. परंतु लगेच गंभीर बनून विचारमग्न झालेला महावीरांचा चेहरा पाहून त्यांच्या अंत:करणातील भावनांचा त्याला स्पर्श झाला. त्याला वाटले, महावीर जणु आपणार उपदेश देत आहेत.

'बा रुद्रा ! क्रोधाला बळी पडून तू माझा छळ केलास. पण अंधाराचे वेष्टण फाडून हसत येणाऱ्या सूर्याप्रामणं तुझ्या उपसर्गाच्या दिव्यातून माझे जीवन अधिकच तेजाळून निघाले आहे. मनुष्य हसत हसत पाप करतो पण रडत रडत त्याला त्याची फळे भोगावी लागतात. मला त्रास देता देता तू मात्र कुकर्माच्या जाळ्यात अधिकाधिक गुरफटून गेलास. त्यात खेदाची गोष्ट अशी की, त्याला निमित्त मात्र मी झालो. कर्म जालातून सुटण्याचा मार्ग आता तरी तू ध्यानात ठेव. क्रोध आल्यास त्याला प्रेमाने जिंक. मानाचा उद्रेक नम्र बनून थांबव. मनाची ॠजुता ठेवून मायेचा नाश कर ! '

रुद्राने पुन्हा पुन्हा भ. महावीरांना वंदन केले. महावीरांची धीर वृत्ती पाहून 'अतिवीर' असे त्यांना संबोधून क्षणार्धात तो तेथून निघून गेला. त्यावेळी महावीरांच्या मुद्रेकडे पाहणाऱ्यांना जरुर वाटले असेल की, महावीर साऱ्या जगाला उद्देशून म्हणत आहेत -

'स्वत:वर मायेचे आणि मोहाचे पांघरुण ओढून त्याखाली घोरत पडलेल्या प्राण्यांनो, उठा ! मत्सरग्रस्त होऊन एकमेकांचा छळ आरंभून विनाकारण का दु:खी होता ? आधी ते मायेचे पांघरुण दूर सारा.

नाही तर सर्वांग पुलकित करणारा सज्जनतेचा वारा तुम्हाला स्पर्शून जाणार नाही. काळझोपेतून तुम्ही केव्हाच जागे होणार नाहीत. '

## सती चंदना

भ. महावीरांचे तपश्चरण चालू असताना एक घटना घडून आली. तिला सामाजिकदृष्टीने अत्यंत महत्व आहे. जातिभेदांच्या अस्तित्वासोबतच गुलामीची अनिष्ट प्रथा त्यावेळी चालू होती. अनेक सुंदर स्त्रियांना पकडून धनिक व्यापारी बाजारात त्यांचा लिलाव करीत. सौंदर्याचा बाजार भरत असे. अहोरात्र धनाच्याच मागे लागलेल्या आसक्त धनवानांनी जगात कोणते पाप केले नाही ? स्त्रियांचा बाजार करुन संपत्ती कमवणारे लोक आजही नाहीत काय ? त्यावेळी ही प्रथा उघड उघड चालू होती.

राजा चेटक म्हणजे वैशालीचा महान् सम्राट ! पण त्याच्याच मुलीवर एकदा मोठी आपत्ति कोसळली. चंदना ही त्याची सर्वात धाकटी मुलगी. प्रियकारिणी त्रिशला ही त्याची ज्येष्ठ मुलगी, म्हणजे चंदना ही महावीराची मावशी होय. ती दिसायला फारच सुंदर होती. तिचे लांबसडक काळेभोर केस तिच्या सौंदर्याचे प्रमुख अंग होते. उमलत्या कमलपुष्पाप्रमाणे तिचा चेहरा सदोदित हसरा असे. डोळे टपोरे अन् आकर्षक होते. पापण्या दाट होत्या, भुवया रेखीव होत्या, ती मंद हास्य करताच कोवळया पर्णाप्रमाणे लाल असलेले तिचे ओठ हळूच अलग होत आणि तिचे कुंदकळ्यासारखे दात दिसून येत. थोडक्यात चंदना म्हणजे वैशालीची सौंदर्यसम्राज्ञी होती. पण विचित्र दैवाच्या फटकाऱ्याचा मारा कोणी चुकविला आहे? सांबराची शिंगेच त्याच्या मृत्यूला कारणीभूत व्हावीत. त्याप्रमाणे चंदनेचे मधूर सौंदर्य तिच्यावरील विपत्तीला कारणीभूत झाले.

वसंतऋतूचा तो दिवस. वैशालीचे उपवन फळाफुलांनी बहरुन गेले होते. सर्वत्र सुगंध दरवळला होता. उपवनातलया सुगंधाने चंदनबालेस लुब्ध केले. वसंताचे वैभव लुटण्याकरिता ती उपवनात गेली. एका वृक्षाला बांधलेल्या झोपाळ्यावरुन ती झोके घेत होती. उपवनातील फुलराणीच ती. त्याचवेळेस एक विद्याधर आकाशमार्गाने जात होता. त्याची विकारी नजर तिच्यावर खिळली. तो कामविह्वल झाला. आपले विमान त्याने खाली उतरवले. हसत्या-खेळत्या चंदनबालेस जबरीने त्याने विमानात बसविले नि घाईघाईने तिच्यासह तो आकाशमार्गाने निघाला. ही गोष्ट त्याच्या पत्नीस समजताच ती देखील आकाशमार्गाने निघाली. त्यामुळे विद्याधर घाबरला. त्याने चंदनबालेस एका दाट अरण्यात सोडून दिले. तेथे एका भिल्लाने तिला पाहिले. त्याच्याही मनात पाप आले. तिचा सुंदर पण निरागस नि निष्पाप चेहरा पाहताच आपली उफाळलेली कामवसाना त्याला मनातल्या मनात दाबावी लागली. त्याने तिला कौशांबीस आणून एका व्यापाऱ्यास विकले. व्यापाऱ्याने तिला कौशांबीस स्त्री-बाजारात नेले. अनेक कामलुब्ध धनिक तेथे तिला विकत घेण्यासाठी जमले होते. पण त्याचवेळी कौशांबीचा प्रसिध्द धनपति वृषभदत्त काही कामानिमित्त तेथे आला. निरागस चंदनेस पाहताच त्याच्या अंत:करणातली ममता जागी झाली. स्त्रियांचा बाजार करुन आपला स्वार्थ साधणाऱ्या नीच लोकांचा त्याला भारी राग आला. त्याने त्या व्यापाऱ्यास काही धन दिले नि तिला घेऊन तो आपल्या घरी आला. आपल्या पोटच्या मुलीप्रमाणे तिला तो वागवू लागला. पण चंदनेच्या उमलत्या तारुण्याने वृषभदत्त शेठजीच्या पत्नीच्या-भद्रेच्या मनात मत्सर निर्माण झाला. ती चंदनेस पाण्यात पाहू लागली. 'वृषभदत्त चंदनेवर भाळला तर' असा विचार तिच्या मनात सतत येऊ लागला. वृषभदत्त चंदनेशी ममतेने बोलू लागला की तिचे काळीज कापत जाई. एकदा वृषभदत्त शेठजी कामानिमित्त प्रवासास गेले असता भद्रेने चंदनेस खूप ता्रस दिला. तिला तिने एका खोलीत साखळीने बांधून बंदिस्त ठेवले. खाण्यासाठी ती तिला कोद्रु धान्य देई. अनेक दिवसांच्या ता्रसाने चंदना वाळून गेली. तिचे सौंदर्य जळून गेले. ती अत्यंत फिकट दिसू लागली. वैशालीच्या पराक्रमी चेटकराजाची आवडती कन्या चंदना दुर्देवी फटकाऱ्याने गुलामीचे जिणं जगू लागली.

कौशांबी ही वत्स देशाची राजधानी. अरण्यात तपश्चर्या करीत भ. महावीर तेथे आहारासाठी आले. एकदा भ. महावीर आहारासाठी असेच चालले होते. ठिकठिकाणी लोक त्यांना पडघावण्यासाठी उभे होते.

राजा राणीसह हात जोडून उभा होता. पण व्यर्थ ! भगवान् महावीर पुढे चालले होते. त्यांच्या उपवासाची वार्ता ऐकून चंदना बरीच दु:खी झाली. शृंखलाबध्द अवस्थेतही तिने आज स्वच्छ आंघोळ केली. सुधौतवस्त्र परिधान केले. तिला मिळणारे कोद्रु तिने भक्तीने शिजविले अन् महावीरांचा शोध घेत घेत ती थोडीशी पुढे आली. भुकेने ती व्याकुळ झाली होती. उभे राहायला तिच्या अंगात त्राणही नव्हते. महावीर फिरत फिरत वृषभदत्त शेठजीच्या घरासमोरुन जात असता त्यांची आणि चंदनेची दृष्टादृष्ट झाली. महावीर हळूहळू चंदनेकडे जाऊ लागले. चंदनेचा आनंद गगनात मावेना. हर्षातिशयाने पुढे येत असता तिच्या पायातील शृंखला आपोआप तुटल्या. तिने पवित्र भावनेने महावीरास आहार दिला. तिच्या शीलाच्या माहात्म्याने हातातील मातीचे भांडे सुवर्णाचे झाले. कोद्रु भाताचे रुपांतर शुध्द नि सात्विक आहारात झाले. तिच्या पुण्याने वृषभदत्त शेटजीच्या घरी रत्नांची नि फुलांची वृष्टि झाली. सारे गाव वृषभदत्त शेठजीच्या घरासमोर लोटले. जो तो चंदनेची स्तुति करु लागला. राजाला चंदनेची हकीकत कळली. परत जाणाऱ्या भगवान महावीरांच्या प्रसन्न मुद्रेवरुन सर्वांना कळून चुकले की, 'चंदना ही महासती आहे, महापुण्यवान् आहे. गुलामीच्या शृंख्लांनी बध्द असलेल्या या महासतीने आपल्या विशाल आत्म्याचा आज आविष्कार केला आहे. चंदना स्त्री असली म्हणून काय झाले ? स्त्रियांनाही आत्मा असतो. त्यांनाही विचार करावयास मन असते. स्त्री म्हणजे केवळ भोगदासी समजून तिच्या आत्मिकस्वातंत्र्याचे अपहरण करणे चुकीचे आहे. त्यांचा बाजार करणे तर महान् पाप आहे. '

कौशांबीच्या अधिपतीने जमलेल्या सर्व लाकांसमक्ष चंदनेचा सत्कार केला, नंतर त्यानी जाहीर केले-

'आजपासून कौशांबीतील स्त्रियांचा बाजार बंद केला आहे. स्त्रीस गुलाम समजून तिची विक्री करणे हा महान् गुन्हा समजून त्याबद्दल कडक शासन केले जाईल.

स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर आघात करुन आपल्या स्वैरवासना पूर्ण करणाऱ्या नीच जगतात त्यांच्या स्वातंत्र्याची ग्वाही त्यांनी दिली. अडीच हजार वर्षापूर्वी त्यांनी हे सांगितले हे विशेष होय.

## केवलज्ञानाचा दिव्य प्रकाश - केवलज्ञान कल्याणक

भ. महावीरांनी सतत बारा वर्षे खडतर तपश्चरण केले. या अवधीत अंतर्मुख होऊन केलेल्या आत्म शोधनातून त्यांना सर्वश्रेष्ठ केवलज्ञानाची प्राप्ति झाली. जृम्भक गावाजवळील ऋजुकूला नदीच्या किनारी मनोहर नावाच्या उपवनात शाल वृक्षाखाली महारत्न नावाच्या शिलेवर ध्यानस्थ बसले असता महावीरांना पूर्ण ज्ञान झाले. त्याच्या प्रकाशाने त्यांच्या आत्म्यात तग धरुन राहिलेला अल्पसा अज्ञानांधकार तत्काळ लोप पावला. सर्व प्रकारच्या लोभाचा आणि समत्वाचा क्षय झाला. तो दिवस वैशाख शुक्ल दशमीचा होता. संमय आणि तपाच्या प्रभावाने आपल्यातील संपूर्ण मल त्यांनी काढून टाकला. हृदय पवित्र झाले. बारा वर्षे तप करुन हे त्यांनी मिळविले. त्यांना न जाणण्यासारखे या जगात काही राहिले नाही. या सर्वोत्तम ज्ञानासच केवलज्ञान म्हणतात.

या दिवशी भ. महावीरांनी आपल्या व्यक्तिमत्वाचा पूर्ण विकास केला म्हणून सर्व लोक त्यांना 'तीर्थंकर' म्हणू लागले. त्यांच्या रुपाने जैन धर्माचा चोविसावा प्रभावी प्रसारक उदयास आला. अहिंसाधर्माचा सम्राट निर्माण झाला. व्देष, असूया, सत्सर इ. विकारांच्या अस्तित्वामुळे अज्ञान, लोभ, दु:ख, अंतराय इ. कर्मांनी वेष्टित होऊन दु:ख भोगणाऱ्या संसारी जीवांच्या दृष्टीने ही घटना अत्यंत महत्वाची होती. कारण दु:खमुक्तीचा मार्ग दाखविणारी पूर्ण विकसित, पुण्यशाली व महाप्रभावी व्यक्ति त्यांना लाभली होती. अंधारात बुडालेले लोक सूर्याच्या प्रकाशाने आनंदित होतात. हेवा, व्देष मत्सर इत्यादींनी ग्रासून गेलेल्या जनतेसही केवलज्ञानी महावीरांच्य दर्शनाने आनंद झाला.

भ. महावीरांना केवलज्ञान झाले, या वार्तेचे सर्वांनी सहर्ष स्वागत केले. स्वर्गातील इन्द्राला तर आनंदाचे भरते आले. भगवंतांच्या दिव्यध्वनीचा सर्वांना लाभ मिळावा ह्या हेतूने इन्द्राने कुबेरास एक सुंदर

'समबसरण' रचण्याची आज्ञा दिली. केवलज्ञानाच्या प्राप्तीनंतर तीर्थंकरांचा जेथे जेथे विहार होतो तेथे तेथे सर्व प्राणिगणांना संसारतापहारक सध्दर्मामृताचे अखंड प्राशन करता यावे म्हणून पहिल्या स्वर्गातील सौधर्मेद्राकडून निर्माण केले जाणारे एक सर्वश्रेष्ठ वैभवसंपन्न स्थान म्हणजे समवसरण होय. समवसरण म्हणजे तीर्थकरांची उपदेश सभा. इन्द्राच्या आज्ञेने कुबेराने तत्काळ अशी रचना केली.

विपुलाचल पर्वतावर हे समवसरण भरले होते. जवळूनच 'ऋजुकूला' आपले दुधासारखे शुभ्र जल उधळीत खळखळ वाहात होती. एका बाजूला उंच उंच पर्वतांच्या ओळी आणि दुसऱ्या बाजूला खोर दरी. पर्वताच्या पायथ्याशी गगनचुंबी झाडी सर्वत्र शीतलता पसरवीत होती. या जीवंत आणि कव्यमय प्रदेशात समवसरणाची रचना झाली. त्याचे एकूण सात विभाग होते. पहिल्या भूमीस 'नाट्यशाला भूमी' असे नाव होते. तेथे सदार्दिदित भजन, किर्तन इ. कार्यक्रम चालत असत. दुसऱ्या जलभूमीत स्वच्छ पाण्यात पूर्ण विकसित कमळे फुललेली होती. त्या भागातील देवदेवींचा नौका-विहार फारच रमणीय भासत होता. तिसऱ्या पुष्पवाटिका भूमीदत सर्वत्र तऱ्हेतऱ्हेची फुलझाडे होती. त्यापुढील अशोकभूमीत अनेक त्यागींचा निवास होता. त्यापुढील ध्वजभूमीत उंच उंच पहाडावर नि स्तंभावर अनेक ध्वज फडकत होते. सहाव्या कल्पवृक्ष भूमीत केवलज्ञानी मुनी शुध्द स्वरुपात विराजमान झाले होते. शेवटच्या प्रदेशास 'स्तूपभूमी' असे म्हणत, येथील गगनचुंबी स्तूपावरील मंदिरात सिध्द आणि अरिहंत देवांच्या मनोज्ञ मूर्ती होत्या. यांनतरच्या चक्राकार भूमीत वारा सभांची रचना होती. त्यातील प्रथमच्या तीन भागात क्रमाने मुनि, कल्पवासी, देव आणि आर्यिका होत्या. त्यापुढे इतर देवदेवी आणि शेवटच्या दोन भागात मानव होते. तिर्यंच प्राणी पशु-पक्षी आपले वैरभाव सोडून बसले होते. या सर्व सभांच्या ठीक मध्यभागी एक गंधकुटी होती. त्यावरील एका कमलाकृति सुवर्ण सिंहासनावर भ.महावीर विराजमान होते. महावीर घातिकर्मातीत असल्याने त्यांचे शरीर परमौदारिक रक्तादि सप्त धातूंनी रहित झाले होते. त्यामुळे ते सुवर्णासनापासून अधरच विराजमान होते. त्यांच्या दर्शनाकरिता इंद्र आपल्या ऐरावत हत्तीवर आरुढ होऊन अनेक देवदेवीसह तेथे आला. सर्व प्रककारच्या देवदेवी, मनुष्य, तिर्यक प्राणी यांनी समवसरण भरुन गेले होते. इंद्रानी समवसरणात प्रवेश करताच भगवंतांना वंदन करुन त्यांची स्तुति आरंभिली. तो म्हणाला -

'हे त्रिलोकनाथ ! आपण आज केवलज्ञानी झालात. आज आपला पूर्ण विकास झाला. समवसरणाच्या दैदिप्यमान वैभवाने आपण युक्त असूनही त्यापासून अलिप्त आहात. भगवन् ! आज आपल्या दर्शनाने आम्ही पुनीत झालो, धन्य झालो, आज आमचे जीवन सफल झाले. प्रभा ! आम्ही सर्व संसारी प्राणी दुःखदावानलात होरपळत आहोत. आमच्या डोळ्यावर अज्ञानाचे आवरण असल्याने आमची स्थिति सर्वत्र आंधळ्यासारखी झाली आहे. आम्हास ज्ञाननेत्र द्या, धर्मामृत पाजा, सुखी करा. '

भगवंतांची स्तुति आटोपून इंद्र आपल्या जागेवर विराजमान झाला. प्रभूंच्या मुखारविंदातून काय बाहेर पडते, याची प्रत्येकजण प्रतीक्षा करु लागला. पण सर्वांची निराशा झाली. भगवंतांच्या मुखातून ध्वनी निघेना. संसारी जीवांना उपदेश मिळेना. सारेच गोंधळात पडले परंतु इंद्राने आपल्या अवधिज्ञानाने ओळखले की भगवंतांचा दिव्य उपदेश आपल्या हृदयात धारण करुन इतरांना समजावून सांगणाऱ्या 'गणधरांची' एका सुयोग्य संधनायकाची आवश्यकता आहे. समस्त संसारी जीवांच्या सुखासाठी इंद्र त्यांच्या शोधात निघाला. गणधराशिवाय भ.महावीरांचा उपदेश इतरांना कळणे अशक्यच होते. सारे समवसरण गणधराची मार्ग्रप्रतीक्षा करीत स्तब्ध होते.

## इंद्रभूतीचे गर्वहरण

इंद्र संधनायकाच्या शोधार्थ निघाला. आपल्या तरल दिव्यज्ञानाने त्याने ओळखले की, प्रसिध्द वेदविद्यापारंगत 'इंद्रभूति गौतम' हाच भ.महावीरांचा प्रथम गणधर होण्यास पात्र आहे आणि नियोगही तसाच आहे. पण इंद्रभूति हा तर पडला कट्टर वेदाभिमानी ब्राम्हण. मगध देशातील गौर्वरग्राम येथील वसुभूतीचा तो ज्येष्ठ मुलगा. यज्ञयागावर आणि वैदिक क्रिडाकांडावर त्याचा भारी विश्वास ! आणि भ. महावीर तर

यज्ञायागातील अमानुष हिंसेविरुध्द ! अशा परिस्थितीत ही दोन परस्पर विरुध्द टोके एकत्र कशी येणार ? पण संसारी जीवांच्या कल्याणासाठी त्यांना एकत्र आणणे आवश्यक झाले होते. भगवंतांना केवलज्ञानाची प्राप्ती होऊन दोन महिने लोटले तरी केवळ या विशिष्ट नियोगाधीन संयोगासाठी त्यांचे 'तीर्थप्रवण' थांबले होते. इंद्राने एका ब्राम्हण बटूचा वेष धारण करुन इंद्रभूतीच्या आश्रमात प्रवेश केला. इंद्रभूती त्यावेळी आपल्या पाचशे शिष्यांना वेदातील गूढार्थ समजावून सांगत होता. सर्वांचे लक्ष या नवागत तेजस्वी बटूकडे वेधले गेले. इंद्रभूतीलाही कोणी तरी नवा शिष्य आपल्या आश्रमात येत असल्याचे पाहून आनंद नि कुतूहल वाटले.

बटू वेषधारी इंद्राने इंद्रभूतीस भ.महावीरांच्या या भावी गणधरास सादर अभिवादन करुन आपल्या हातातील एक ताडपत्र पुढे करीत म्हटले -

'महाराज ! माझ्या गुरुंनी मला एक श्लोक दिला आहे. परंतु त्याचा अर्थ स्पष्ट करुन सांगण्याच्या आधीच ते ध्यानमग्न झाले. तेव्हा आपल्या प्रगाढ विव्दत्तेची महती ऐकून मी तो समजून घेण्यासाठी आपणाकडे आलो आहे. आपण त्याचा खुलासा सांगू शकाल तर महपदुपकार होतील या दासावर ! '

'सांगू शकाल ? ' इंद्रभूतीने खोचक नजर फेकीत विकट हास्य केले.

'हा आमच्या गुरुजींचा अपमान आहे ! ' सारा शिष्यगण ओरडला.

'अखिल वेदविद्या, व्याकरणादि शास्त्र आणि सर्व पुराण मुखोद्‌गत असणाऱ्यास अमुक श्लोकाचा अर्थ 'सांगू शकाल' असे विचारताना तुझी जिव्हा लाजेने अडखळली कशी नाही ? ' इंद्रभूती मान उंचावून त्याचा अधिक्षेप करीत म्हणाला व पुन्हा एकदा त्यांनी विकट हास्य केले.

'क्षमा असावी गुरुदेव ! माझा आशय तो नाही. मला फक्त या श्लोकाचा अर्थ हवा आहे. '

'वाच तुझा कुठला श्लोक आहे तो ! '

इंद्राने वाचण्यास सुरुवात केली -

**त्रैकाल्यं द्रव्यषटकं नवपदसहितं जीवषटकायलेश्याय:।**
**पंचान्ये चास्तिकाया व्रतसमितिगतिशज्ञानचारित्रभेदा: ॥**
**इत्येतन्मोक्षमुलं त्रिभूवनमहितै: प्रोक्तमर्हभ्दिरीशै: ।**
**प्रत्येति श्रदद्‌धाति स्पृशति च मतिमान् य: स वै शुध्ददृष्टि: ॥**

श्लोक म्हणून संपला. इंद्रभूतीने डोळे वर केले. त्यास बटूची शंका आली. हा कोणी तरी अर्हद्‌भक्त असावा हे त्यानपी हेरलेध पण त्याने विचारलेल्या अर्थासंबंधी काय?

इंद्रभूति गोंधळात पडला.ऐकलीला श्लोक त्याला सर्वस्वी नतीन होता. सहा द्रव्ये, नऊ पदार्थ, पंचासितकाय, पंचसमित या साऱ्यांशी तो अनभिज्ञ होता. षट्‌काय नि सहा लेश्या ही काय भानगड आहे हे विचार करुनही त्यास समजेना. परंतू आपले हे अज्ञान या बटूसमोर आणि आपल्या शिष्यगणासमोर प्रकट होऊ देण्यास त्याचे मानी मन कसे तयार होणार? थोडा वेळ थांबून तुच्छतेचा एक कटाक्ष फेकीत तो म्हणाला

अरे, यात काय मोठे अवघड आहे? पण या श्लोकाचा अर्थ तुझ्या गुरुला तरी माहीत आहे काय? माहीत नसावाच बहूतेक ! एरव्ही त्याने स्वत: ध्यान धरुन तुला पाठविलेच नसते.

महाराज, असा कांही प्रकार नाही. पण आपण सांगितलेला अर्थ मी त्यांच्यापुढे निवेदन करीन. अगर आपली इच्छा असलयास आपणच त्यांच्यापर्यत चालण्याचे कष्ट घेऊन या श्लोकाचा खुलासा करावा. मोठाच अनूग्रह होईल मजवर ! बटू विनयाने म्हणाला.

मीही तोच विचार करीत आहे. यात तूजपेक्षा तूझ्या गुरुचीच परीक्षा मला घेता येईल चल. इंद्रभूति गर्वाने म्हणाला, बटु वेषधारी इंद्राला अपार हर्ष झाला. आपले ईप्सित इतक्या लवकर व अशा अनपेक्षितपणे सफल होईल असे त्याला वाटले नव्हते. त्याने सर्व शिष्यगणासही बरोबर चलण्याचा आग्रह केला. अखेर अनुज्ञेप्रमाणे तेही बराबर निघाले. सारा समूह भ. महावीरांच्या दिशेने मार्गक्रमण करु लागला. मगध देशातील विपुलाचल पर्वतावरील समवसरणाजवळ ते येऊन ठेपले.इंद्रभूति इंद्राच्या मागोमाग समवसरणाकडे निघाला.

दुरुनच समवसरणाच्या भव्यतेची व दिव्यतेची त्याला कल्पना आली. वर्तुळाकार असलेल्या समवसरणाचा विस्तार दोन योजने असून त्याचा पृष्टभाग अतिशय दैदिप्यमान इंद्रनील मण्यांनी सुशोभित केला होता. त्याच्याभोवती इंद्रनील, चंद्रकांत इ. मण्यांनी आपले तेज सर्वत्र विखुरल्याने त्याचे अनेक रंग इंद्र धनुष्यातील रंगाप्रमाणे भासत होते. त्याच्या चारी बाजूस धर्मध्वजांनी मंडित चार उंच स्तंभ होते. प्रत्येक स्तंभावर भगवंतांच्या चार रत्नमय मूर्ती सात्विक भावनांचा वर्षाव करीत होत्या. गौतमाचे लक्ष या मानस्तंभावरील वीतराग मुद्रेकडे जाताच तिच्यातून ओसंडून वाहाणारा पवित्र भाव त्याच्या ह्रद्याला न कळत स्पर्श करुन गेला आणि चमत्कार असा की, हिवाळ्यात झाडावरील पिकलेली नानें वाऱ्याच्या झोतासरशी गरगरत खाली पडावीत त्याप्रमाणे गौतमाच्या अंत: करणातील अहंकार नि अभिमान तत्काळ गळून पडला. त्याचे मन गाळ नसलेल्या सरोवरातील जलाप्रमाणे स्वच्छ झाले. त्याच्या बुध्दीवरील मिथ्यात्वाचे घनदाट पटल हां हां म्हणता दूर होऊन ती पवित्र नि मंगल बनली. जन्मोजन्मी साचविलेले मिथ्यात्व मानस्तंभावरील मूर्तीकडे पाहाताच विस्तवावर विरघळणाऱ्या लोण्याप्रमाणे विरघळून गेले. अशा विशुध्द मनोवस्थेत इंद्राबरोबर गौतमानी आत प्रवेश केला. इंद्रासह समवसरणाच्या अनेक भूमीत प्रवेश करीत इंद्रभूति गौतम भगवान महावीरांजवळ उपस्थित झाला. त्रिलोकवंदनीय तीर्थंकर भ. महावीरांचे दर्शन होताच तो अत्यंत विनम्र झाला. निर्ग्रंथ योगिसम्राट् भगवंतांनाप पाहून तो अतिशय प्रभावित झाला. प्रभूंच्या इंद्रभूति गौतमास पाहाताच त्याचे नांव घेऊन भ. महावीर म्हाणाले -

इंद्रभूति! तुला शंका आहे का, जीव आहे की नाही? परंतु या बाबतीत शंका बाळगण्याचे कारण नाही. जीवद्रव्य निश्चित आहे. जीवाचा अभाव पूर्वी कधी नव्हता आणि यापुढेही होणार नाही. आत्मा हा चित्, चैतन्य, विज्ञान आणि संज्ञान आदि लक्षणांनी सहित आहे. आत्म्याच्या अस्तित्वाचा अभाव मानला तर पुण्य-पाप, धर्म-अधर्म यांचा वाली कोण राहील ? पशु-पक्षी यांच्यातही आत्मा आहे. अज्ञान नि स्वार्थवश यज्ञात त्यांचा बळी देणे सर्वथा अयोग्य आहे.

भ. महावीरांनी आपल्या मनातील नेमकी शंका हेरुन आपल्या दिव्य ज्ञानाने तिचे निरसन केल्याबद्दल दनद्रभूतीचं ह्रद्य भकतीनं भरुन आलं . त्याच्या अंत:करणातली मिथ्यात्वाची गाठ सुटली. त्यानं इंद्राने विचारलेल्या श्लोकासंबंधी विचारलं असता भ. महावीरांनी थोडक्यात सांगितलं ,

जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल ही सहा द्रव्ये त्रिकालाबाधित आहेत. जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा , मोक्ष , पाप व पुण्य हे नऊ सत्पदार्थ आहेत. जीव, धर्म, अधर्म, आकाश, पुद्गल या पंचास्तिकायात सर्व विश्वाचा समावेश होतो. जीवाच्या कृष्ण, नील, कापोत , पीत, पद्म व शुक्ल

या सहा लेश्या आहेत. मोक्ष प्राप्तीचा मार्ग विधिजनित आहे - वगैरे जिनवचनावर जो श्रध्दा ठेवतो तो भव्य जीव मुक्तिगामी होय.

भगवंताच्या उपदेशानंतर गौतमानं तत्काळ आपल्या सर्व शिष्यांसह जैनेंद्र दीक्षे चा स्वीकार केला. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने व्हावे त्याप्रमाणे भ. महावीरांच्या सान्निध्याने इंद्रभूती गौतमाचा उध्दार झ ाला. तो प्रथम हिंसावादी होता. पण आता त्याचे आमूलाग्र परिवर्तन झाले. तो भ. महावीरांना म्हणाला,

भगवन आजपर्यत मी अंधारात चाचपडत नि ठेचाळत मार्गक्रमण करीत होतो. अन् इतर अज्ञ जीवांनाही अंधारात लोटीत होतो. आज सम्यगज्ञानाच्या किरणांनी माझ्या जीवनाचा प्रत्येक कोपरान् कोपरा अजाळून निघाला आहे. प्रभो ! मी आपणास शरण आलो आहे. माझे जीवन उन्नत करा.

इंद्रभूति गौतम भ. महावीरांचा प्रथम शिष्य झाला. त्यास ताबडतोब बुध्दि, औषधी, अक्षय, ओज, रस, तप आणि विक्रिय या सात लब्धी- ऋध्दि प्राप्त झाल्या. त्याचे ज्ञान इतके निर्मल झाले की, भगवंतांच्या दिव्यध्वनीचा अर्थ हृदयात धारण करण्याची क्षमता त्याच्या ठिकाणी आली. उच्च कोटीचं मन :पर्चय ज्ञान त्यास प्राप्त झाले. आणि तो भ. महावीरांचा प्रथम गणधर झाला.

समवसरणात जमलेल्या समस्त संसारी प्राण्यांना आनंद झाला. पंभूची वाणी ऐकावयास मिळणार याबद्दल सगळे हर्षित झाले. समवसरणात गणधराशिवाय भगवंतांची वाणी समजू शकत नव्हती. इंद्रभूति गौतमाच्या आगमनाने भगवंतांची वाणी समजू लागली. समवसरणात आलेल्या सर्व प्राणिमात्रांची पउदेश-श्रवणाची इच्छा सफल झाली. गौतम गणधरानी भ. महावीरांच्या दिव्यध्वनीचा सूक्ष्म आशय अचूकपणे लक्षात घेऊन व्दादशांग प्रव्यश्रुताची पदरचना केली. भगवंतांचा दिव्यध्वनि प्रत्येक संधिकालात तीन तीन तासांच्या अंतराने होत असे. अवांतर वेळी गौतम गणधर त्याचा मथितार्थ समजून सांगत . साधारणतः तो पुढीलप्रमाणे असे .

दृष्टिहीनः  पुमानेति न यथा पदमीप्सितं । दृष्टिहीनः पुमानेति न तथा पदमीपप्सितं ॥

जगात सर्व जीव मोहाने दृष्टिहीन माणसाप्रमाणे वागत आहेत. तृष्णारुपी विषवेल ज्यांनी उपटून टाकली आहे ते धन्य होत. विनाश, दुःख किंवा पतन यापसून जीवाची सूटका दु१सरा कोणीच करु शकत नाही. आपला उध्दार जीव स्वतःच करु शकतो . जगात आतापर्यत प्रत्येकानं इंद्रियांच्या विषयांचे सेंवन अनेक वेळा केलं आहे. परंतु त्याससंबंधी तृपित कधीच झाली नाही. इंद्रियांचे सेवन जसजसे अधिक करावे तसतशी त्यासंबंधी वासनाही अधिक प्रज्वलित होते. तृष्णा वाढतच जाते. तृष्णापूर्तीच्या अभावी दुःखी झलेला जीव स्वतःवे हित आणि अहित ओळखत नाही. विवेकहीन होऊन तो संसाराच्या चिखलात अधिकच खोल रुतून बसतो. संसारातील सारी दुःख किंवा जन्म -मरणाचे चक्र देख्वाील केवळ मोहावर विवेक नि संयमाच्या बलाने जो विजय मिळवितो तोच या संसारचक्रातून व सर्व प्रकारच्या दूःख्वतून मुक्त होतो. त्यालाच परमात्मा किंवा ईश्वर म्हणतात. पण अज्ञानामुळे जी हे सारे ओळखू श्याकत नाही. म्हणून अज्ञानाचा पडदा दूर सारा. ज्ञानाच्या प्रकाशात आपले रुप पाहा. ते आपणास भव्य नि दिव्य भासेल. आत्म्याच्या स्वरुपासंबंधी श्रध्दा ठेवा. त्याचे समीचीन ज्ञान प्राप्त करुन घ्या. आणि त्याप्रमाणे निर्मल आचरण ठेवून आपला आत्मा परमात्मा बनवा.

समवसरणातील सर्व प्राणी भगवंतांच्या मुखातून निघालेल्या या दिव्य वाणीनं कृतार्थ झाले. त्यासंचे अज्ञान दूर झाले. दु:खमुक्तीचा मार्ग  त्यांना सापडला.

## भत्कीचा महिमा

मगध देशाची राजधानी राजगृही ही त्यावेळच्या सुप्रसिध्द नररांपैकी एक होती. केवलज्ञानी भगवान महावीर सर्व जीवांना पउदेश देत देत भारतात विहार करीत होते. एकदा राजगृह नगरीजवळ ते आले. भगवान महावीरांचे आगमन ही किती भाग्याची गोष्ट ! मगधाधीश राजा श्रेणिकास त्यामुळे झुंडी महावीरांच्या दर्शनाकरिता जाऊ लागल्या. राजा श्रेणिक आपली प्रिय राणी चेलनेसह दर्शनार्थ निघाला, बरोबर निडक सैन्य होते. राजा आणि राणी हत्तीवरुन जात होती. अनेक नागरिकही त्यांच्याबरोबर जात होते. भ. महावीरांचा सतत जयघोष चालला होता.

राजगृह नगरीला आज एखादा मंगल पत्सवाचे स्वरुप आले होते. नागदत्त श्रेष्टीची विधवा भार्या भवदत्ता देख्व्यील प्रभूंच्या दर्शनार्थ निघाली. ती आपल्या घरातील विहिरी जवळून जात असता तेथल्या एका बेडकानं तिला पाहिले. पंभूंच्या भकतीची भवना त्यालाही क्षणभर स्पर्शून गेली. त्याचे अंग पुलकित झाले. भावना पवित्र झाली. विहिरीच्या काठी लहान लहान फुल तोंडात धरले आणि तेही नगरवासींबरोबर निघाले. रस्त्याच्या कडेनी हळू हळू चालले होते ते. रस्त्यातून जाणाऱ्या एका प्रचंड प्राण्याकडे त्याने पाहिले. राजा श्रेणिकाचा हत्ती होता तो. त्यच्या मागून अनेक लोक चालले होते. बेडकाला वाटले, आपण्ही राजाच्या मागूनच जावे. त्याप्रमाणे ते हतती जवळ गेले. पण दुर्दव बेडकाचे ! ते हत्तीच्या पायाखाली सापडले. डराव म्हणून त्याची किंकाळी जेव्हा बाहेर पडली तेव्हा मागाहून जाणऱ्या लोकांचे लक्ष फुलाकडे गेले. जमिनीवर पश्रडलेल्या फूल मात्र एका बाजूला, बेडकाची भक्ति दाखवी पडली होती. बेडकाची भक्ती महावीरापर्यत पोहोचली.

समवसरणात पोहचताच राजा-राणीनी भक्तिभावाने प्रभूंना नमस्कार केला. अष्टद्रव्यानी त्यांची पूजा केली. नंतर चेलनेसह समवसरणातील मानवसभेत ते जाऊन बसले. भगवंतांचा मधून दिव्यध्वनि ऐकून त्यांना फारच समाधान वाटले.प्रभूचा उपदेश ग्रहण करीत असता श्रेणिकाचं लक्ष समवसरणातील सौधर्म देवाकडे गेले. त्यांच्यापैकी एका देवानं आपल्या मुकुटावर बेडकाची प्रतिमा धारण केली होती हे पाहून श्रेणिकास आश्चर्य वाटले. त्याने त्या देवसंबंधी कुतुहलाने गौतमगधाला प्रश्न विचारला. गौतम गणधरानी श्रेणिकास सांगितले.

राजन ! ह्या देवासंबंधी तुला कुतूहल वाटावे अशीच घटना त्याच्या बाबतीत घडलेली आहे. हा दिव्य देहधारी देव काही वेळेपूर्वीच तिर्यक अवस्थेत होता हे ऐकून तुला खरंही वाटणार नाही. तुझ्या नगरीतील भवदत्तेच्या विहिरीतला एक बेडूक आपल्या मुखात एक फुल धरुन तुमच बरोबरच येत होता. पण रसत्यात तुझ्या हत्तीच्या पाचाखाली तो चिरडला गेला. भक्तीची भावना त्याच्या त्याच्या अंत:करणात इतकी तीव्र होती की, तिच्या प्रभावाने तत्काल तो सौधर्म स्वर्गात देव होऊन जनमला. क्षणात त्याला चौवनदश प्राप्त होऊन तो देव येथे आला आहे. पूर्वभावाची स्मृति म्हणून आपल्या मुमुटावर त्याने बेडकाची प्रतिमा धारण

केली. भगवंतांचे भक्तिपाथेय शिदोरी घेऊन प्रवास करणाऱ्या पथिकाप्रमाणे भक्ताला सदोदित उपयोगी पडते. भक्तीचा हा असा महिमा आहे.

गोतम गणधराकडून बेडकाची ही कथा ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले. भ. महावीरांवर त्यांची भक्तिही अधिकच दृढ झाली.

## पुण्य पापाची फळे

केवळ ज्ञानची दिव्य ज्योती प्राप्त होताच भ. महावीरांची अखंड पदयात्रा सुरु झाली. भारतातील अनेक भागात त्यांचा विहार झाला. या काळात त्यांना अनेक शिष्य मिळाले. त्यात राजे होते, महाराजे होते, सामान्य लोक होते, आणि आपल्या संघासह ते सर्वत्र विहार करुन धर्मोपदेश देत.

मगधीश राजा श्रेणिक हा भ. महावीरांचा शिष्योत्तमांपैकी एक होता. त्याचेच नाव बिंबिसार ! त्याने मगधावर इ. स. पू . ५४३ ते इ .स .पू. ४९१ पर्यत राज्य केले. प्रारंभी तो बुध्दानुयायी होता. पण पुढे आपली प्रियराणी चेलना हिच्या प्रभावाने व भ. महावीरांच्या महात्म्याने तो जैन झाला. राजा श्रेणिकाचे जैन वाङ्मयातील स्थान अनन्य साधारण आहे. आज विधमानप असलेले जैन वाङ्मय हे एका दृष्टीने श्रेणिकाचे कुशग्र बुध्दीचेच दृश्यफळ आहे. असंच म्हटलं पाहिजे. निनिरापळ्या प्रसंगी समवसरणा ात गौतम गणधाला त्याने अनेक प्रश्न विचारुन माहिती गोळा केली. त्याने विचारलेल्या प्रश्नांची संख्या साठ हजार होती.

सम्राट श्रेणिकाच्या वडिलांचे नाव उपश्रेणिक होते. त्यांना इन्द्राणी राणीपासून श्रेणिक जन्मला. बालपणापासूनच तो

अत्यंत हुशार होता. क्षत्रिय राजपुत्रास उचित अशा सर्व विध्या त्याने ग्रहण केल्या. पउश्रेणिकानंतमर त्याचे राज्य

श्रेणिकाच्या सावत्र भावास- चिलातीस मिळाले. त्यामुळे राज्सयाबाहेर पडून श्रेणिक इकडे तिकडेभटकत होता.

काही दिवस तो बौध्दभिक्षूंच्या आश्रमात जाऊन राहिला. तसयामुळे त्याच्या मनावर बौध्दधर्माचा परिणाम होऊन

त्याने तो धर्म स्वीकारला. पुढे कपटाने त्याने मगधावर हल्ला चढवुन चिलातीचे राज्य बळकावले. आपल्या राज्यात

बौध्दधर्मास आश्रय दिला. वैशालीपति राजा चैटक ह्याच्या चेलना नामक कन्येशी त्याने चेटकास फसवून लग्न लावले.

तिच्या सहवासाने पुढे तो जैन बनला. नंतर तो भगवान महावीरांचा कट्टर भक्त झाला. त्यांचे दर्शन घेतल्याशिवाय

त्याला अन्नपाणीही गोड लागत नसे. सम्राट असल्याने भकतीबरोबर डामडौलही वाढत चालला.

एकदा भगवंतांच्या समवसरणा ात जाऊन त्याने गौतमगधरांना प्रश्न केला. माझ्या मृत्युनंतर मी कोठे जन्म घेणार आहे ?

श्रेणिकाच्या या प्रश्नाने गौतम गणधर प्रथम स्तब्ध राहिले. त्याच्या आजवरच्या प्रश्नाहून हा प्रश्न निराळा होता. पण त्याचे भविष्य भीषण होतो, अंधारमय होते. गौतम गणधर म्हणाले-

राजन् ! या संसारात प्रत्येकास आपल्या कृतकर्माप्रमाणे फळ मिळत असते. केलेल्या भक्तीप्रमाणे पुण्य मिळते. भाग्यवंतांची भक्ती सदोदित खरीच असते असे का तुला म्हणयचे ?

श्रेणिक गडबडला. लोक त्याच्याकडे तुतुहलाने पाहू लागले. खोटं हास्य आणून त्याने विचारले, सरळ सरळ सांगून माझ्या मनातील संभ्रम दूर करावा, अशी आपल्या चरणी विनंती आहे.

राजन् ! गत गोष्टीचा तू आपल्या मनाशी विचार कर. केलेली दुष्ट कर्मे आठव ! तुझ्या राज्यातील लोकांना अचूक न्याययदान करणारा म्हणून तू प्रयिध्द आहेस. पण तुझा अंतरात्मा तुझ्या कृत- मृत्यांबद्दल तुला न्याय देऊ शकत नाही. मलाच तू विचारणार असशील तर मी सांगेन, तुझं भविष्य काळंकुट्ट आहे. अंधकारमय आहे. पुढील भवात तू प्रथम नरकात जाणार आहेस.

भ. महावीरांच्या शिष्योत्तमाचं हे भविष्य ऐकून सर्व लोकांना आश्चर्याचा धक्काच बसला. चेलना खिन्न झाली. लोक राजाकडे उपहासाने पाहू लागले. तितक्यात श्रेणिकानं स्वतःस सावरुन घेतले. गौतमगणधर म्हणाले-

राजन् ! मी तुझंच भविष्य सांगतो. आणि सांगितले ते भविष्य ते भक्तीचे नसून तुझ्या पापाचे आहे. तू भगयवान

झालास म्हणून तुझी भक्ती पवित्रच असेल असे कसे म्हणता येईल ? भक्तीचा हा डामडौल सोडून दे. पवित्र मनाने भक्ती कर. पण ध्यानात ठेव. कृतकर्माचे फळ म्हणून पडलेला आयुर्बन्ध बदलणे आता तुझ याही हाती नाही. अन् माझ्याही हाती नाही. त्यामुळे मिळणाऱ्या सुख-दुःखला जो तोच जबाबदार आहे. तू केलेल्या एका दुष्ट कृत्याचे फळ म्हणून तुला आयुर्बन्ध झला आहे. अन् तोही नरकायूचा बंध आहे. त्यात आता बदल होणार नाही. पण तयानंतरच्या तुझ्या आयुष्याचेही भविष्य मी जाणतो. यापुढे तू पवित्र अंतःकरणाने भक्ती करशील तर पुढील तिसऱ्या भवांत तीर्थकर बनून मोक्षास जाशील.

मुक्ति आणि नरक यांच्या सीमारेषेवर असलेल्या श्रेणिकास दुःखाने असे व्याकुळ करुन सोडले तसे मुक्तीच्या भविष्याने झालेला आनंद त्याच्या अंतःकरणाचा बांध फोडून बाहेर पडू लागला. त्याने पुन्हा नम्रतेने विचारले,

मला नरकायूचा बंध पडण्याचे कारण कोणते ?

कारण अवश्य आहे. चेटक राजाच्या चेलना मुलीशी वाममार्गाने तू विवाह केलास. बळजबरी करुन तिच्यावर बौध्दधर्म लादण्याचा प्रयत्न केलास. तिला बौध्द बनविण्याकरीता पाठविलेल्या भिक्षूस तिनेच वादात जिंकले. आपल्या गुरुंचा चेनेकडून झालेला अपमान तुला पाहवेना . तिचा विजय तुझ्या डोळ्यांत खुपू लागला. त्याची तू विचित्र भरपाई केलीस. तिच्या कृत्याचा सूड उगविण्याकरिता तू शिरीस जंगलात गेला असता तेथे ध्यानस्थ बसलेल्या दिगंबर मुनीला छळण्याच्या भूमिकेने तू आपले शिकारी कुत्रे मुनींच्या अंगावर सोडलेस, तथापि ते पुढे जाताच मुनींच्या प्रभावाने शांत होऊन निरुपद्रवी झाले. शेवटी हातात तलवार घेऊन त्यांना मारण्यासाठी तू धावलास पण वाटेत मोठा सर्प जात असलेला पाहताच तयाचे मसतक छाटून तो मृत सर्प मुनींच्या गळ्यात अडकतून तू धरी गेलास. दोन तीन दिसानी ही हकीगत तू चेलनेला सांगितलीस. तेव्हा ती म्हणाली, ज्यांच्या गळ्यात तू मृत सर्प घातलास ते मुनि तेथेच असतील, चला त्यांचा उपसर्ग दूर करुया. काही दिवसांनी तू चेनेसह त्याच जंगलात गेला असता ज्यांच्यावर तू उपसर्ग केला होतास ते मुनि तसेच निश्चलपणे उपसर्ग सहन करीत तपश्चर्या करीत होते. अनेक मुंग्या त्यांच्या अंगाला चिकटून त्यांना डसत. मुनीच्या तपश्चर्येचे तुला आश्चर्य वाटलें. खऱ्या आणि खोट्या साधूंची पारख झाली. ताबडतोब त्यांच्या वरील मृत साप दूर करुन तू करुन तू त्यांना क्षमेची याचना केलीस. निष्पाप मुनीला दिलेलया उपसर्गाबद्दल तुला नरकायूचा बंध पडला आहे. पण त्यांच्या वरील उपसर्ग दूर केल्याचे फळ म्हणून निसऱ्या भवांत तू या भरत क्षेत्रांत पहिला महापद्म नामक तीर्थकर होशील.

पुण्य- पापाचे गौतम गणधरांनी सांगितलेले फळ ऐकून समवसरणात जमलेल्या लोकांचे डोळे उघडले. सदोदित धर्माचरण करण्याचा निश्चय करुन सर्वजण आपापल्या घरी परतले.

## कालसौकरिकाची कथा

मगध देशातील राजगृह नगरीत कालसौकरिक नावाचा कसाई राहात होता. आपल्या राज्यात कोणीही प्राणिवध करता कामा नये असा श्रेणिकाने हुकूम काढला होता. पण कालसौकरिकाने तो ठोकरुन दिला. यामुळे श्रेणिकाला फार राग आला. त्याने काल सौकरिकास बोलातून घेतले नि राजाज्ञा अमान्य करण्याचे कारण विचारले. कालसौकरिक हा फारच हिंसक होता. शिवाय त्यावर त्याचा चरितार्थ अवलंबून होता. तो म्हणाला-

महाराज ! यात माझा कोणता दोष आहे ? हजारो लोकांची रसनातृपती करण्याचे पवित्र काम मी करीत आहे. राजगृहांतील लोक मला त्याबद्दल धन्यवादच देत आहेत. कसायाचा धंदा सोडणे मला अशक्य आहे. माझा नि माझ्या कुटुंबाचा चरितार्थ त्यावर तर अवलंबून आहे.

तुझ्या पोटा -पाण्याची सर्व व्यवस्था करण्यात येईल पण प्राणिवध न करण्याची तू प्रतिज्ञा घे.

कालसौकरिंकाची नैसर्गिक हिंसक वृत्ति ऊफाळून आली. तो म्हाणाला,

महाराज ! हे माझ्याकडून जमणे अशक्य आहे.

राजदरबारात आपल्या डोळ्या देखत श्रेणिकाचा अपमान झाला होता. राजा भयंकर क्रुध्द झाला. त्याने राजगृहातील एका अधकरमय कोठडीत कालसौकरिकास कोंडून ठेवण्याची आज्ञा दिली. आपल्या राज्यातील हिंसा सुपूर्णतः बंद पडली या जाणीवेने त्याला फार आनंद झाला. एकदा नेहमी प्रमाणे प्रभु महावीरांच्या दर्शनास तो गेला. त्यांना भक्तीने बंदन करुन तो गौतमगधराना म्हणला,

गणधर ! माझ्या राज्यातील प्राणिवध मी आता पूर्णपणे बंद पाडला आहे. माझ्या आज्ञेचा भंग करुन प्राणिवध करणऱ्या कालसौकरिकास मी अंधारकोठडीचा रस्ता दाखविला आहे.

राजन् ! राज्यातील हिंसा बंद पाडली म्हणून सर्व लोक अहिंसक बनले असा त्याचा अर्थ नव्हे. हिंसक आणि अहिंसक ठरविण्याची कसोटी निराळी आहे. कालसौकरिकाचीच गोष्ट घे ! तू त्यास अंधारकोठडीत घातले म्हणून को तो अहिंसक झाला ? त्याची हिंसकवृत्ति जोपर्यत आहे तोपर्यन्त तो हिंसकच होय. अंधार कोठडीतही तो हिंसाचार करीत आहे. प्रबळ हिंसकभवनेमुळे तो मातीची गाय, म्हैस आदी बनतून रोज त्यांच्या माना मुरगाळतो. आणि हिंसा केल्याचे समाधान मानतो. जिवंत प्राण्यांचा वध करीत असता त्याला जसा आनंद व्हायचा तसाच आताही त्यास होतो. म्हणून हिंसक, अहिंसक ठरविणे ज्याच्या त्याच्या भवनेवर अवलंबून आहे. वृत्ति अहिंसक असूनही चुकून जर हिंसा घडली तर ती हिंसा नव्हे. गौतम म्हणाले.

श्रेणिक क्षणभर गोंधळला. नंतर तो विनयाने म्हणाला, महात्मन ! याचा अधिक खुलासा केल्यास धन्य होऊ आम्ही.

याचा ख्व्युलासाच हवा असेल तर ऐका. शेतकरी जमीन नांगरीत असता हजारो त्रसजीवांची जत्या होते. प्रत्यक्ष जीवांची जत्या होणे यास द्रव्य-हिंसा म्हणतात. ही हिंसा सर्व शेतकरी सदोदित करीत असतात. पण तिचे पातक त्यांना नाही. जलाशयात जाळं टाकून मासे पकडण्याचे काम कोळी करतो. खूप मासे सापडावेत अशी त्याची प्रबळ भावना असते. एखाद्या दिवशी एकही मासा त्याला मिळाला नाही असे समज, मासे न पकडताही त्या दिवशी तो अहिंसक ठरत नाही. कारण हिंसक भावना त्याच्यात ओतप्रोत भरलेली असते. यामुळे तो तीव्र हिंसक आहे.मनाने केलेल्या हिंसेस भव-हिंसा म्हणतात. ही भाव-हिंसाच अत्यंत घृणास्पद आहे. त्याज्य आहे. असाध्य रोग नष्ट करण्याकरिता वैद्य रोग्याच्या शीरावर शस्त्रक्रिया करतो. काही काही वेळेस त्याच्या हातून रोगी दगावतो . म्हणून काय तो हिंसक झाला ? त्याचची भावना अहिंसक

रोगी बरा व्हावा हीच त्याची भावना असते. भावना चांगली असूनही द्रव्यहिंसा घडते. पण त्याचे त्याला पातक नाही. अहिंसेचा हा मूलभूत सिध्दांत आहे.

मनसैव कृतं पापं न शरीरकृतं कृतम् । येनैवालिंग्यते कांता तेनैवालिंग्यते सुता ॥

ही गोष्ट प्रत्येकाने ध्यानात ठेवावी . हिंसक प्रवृत्ति ठेवून स्वतः हिंसा करणे, हिंसेस अनुमोदन देणे किंवा दुसऱ्यांकडून ती करविणे या गोष्टी त्याज्यच. मांस खाणारे स्वतःहिंसा करीत नसले तरी हिंसेस त्यांची अनुमति असल्याने तेही हिंसकच होत.

गौतम गणधराच्या हिंसा-अहिंसेवरील उपदेशाचा श्रेणिकासह साऱ्यांच्याच अंतःकरणात खोलवर ठसा उमटला. आज आपल्याला नवीन अनुभूति मिळाली या आनंदात श्रेणिक राजवाड्याकडे परतला.

## महानिर्वाण- मोक्षकल्याणक

भगवान महावीरांचा विहार एखाद्या वाहत्या नदीप्रमाणे सतत चालू राहिला. जैन श्रमणांचे जीवन वाऱ्याप्रमाणे असते. त्यांनी एके ठिकाणी कधी राहायचे नसते. केवलज्ञाने प्राप्तीनंतर एकोणतीस वर्षे तीन महिने अणि चोवीस दिवस त्यांनी सतत विहार करुन धर्मामृताचा वर्षाव केला. तीर्थकर होण्यापुर्वीच्या अनेक भवात हा त्यांचा विहार होता. तीर्थकरावस्थेंत ( केवलज्ञाननंतरच्या अवस्थेत ) कसल्याही शुभाशुभ भावना शिल्लक राहिलेल्या नव्हत्या.

विहार कालात गतजन्मातील पुण्यविपाकस्वरुपी आपल्या तत्वज्ञानाचे संस्कार जनसामान्यावर स्थायी रुपाने राहावे त या उद्देशाने त्यांनी चुविंध संघाची स्थापना केला. होती. मुनि, आयिका, श्रावण आणि श्राविका हेच ते चार प्रकारचे संघ होत. त्यांपैकी मुनि व आर्यिका घरा-दाराचा त्याग करुन धर्मसाधना करीत. श्रावक आणि श्राविका घरी राहूनच आपपल्या शक्तीप्रमाणे धर्माचरण करीत. साधूंची संख्या चौदा हजार होती. आर्यिकांची संख्या छत्तीस हजार होती. एक लक्ष नव्वद हजार श्रावक आणि तीन लाख अठरा हजार श्राविका होत्या.

वर उल्लेखिलल्या सांघात मोठ मोठे राजे, राजकुमार, राजमुमारी, राण्या, श्रेष्ठी, सावकार, ब्राम्हण, क्षत्रियादि सर्व जातीतील लोक होते. त्यात धनवानही होते आणि गरीब देखील होते. आर्यिकांचे नेतृत्व महासती चंदनेकडे होते. राजकुमारी चंदनेने महावीरांचे शिष्यत्व पत्करुन विशुध्द जीवनाचा अंगीकार केला होता. या चतुर्विध संघाचा अधिनायक इंद्रभूति गौतम होता. इंद्रभूति गणधराप्रमाणेच महावीरांच्या संघात अग्निभुति, साचुभुति आर्य सुधर्माचार्य, मौर्चपुत्र, अकंपित, अचलवृत्त, मैत्रेय आणि प्रीाास आणखी दहा गणधर होते. महावीराच्या चतुर्विध संघाचे हे नायक होते.

वरील  संघ- व्यवस्था करुन भ. महावीरांनी मानवजातीवर फार मोठे उपकार केले आहेत. मिथ्या मार्गाचे अनुकरण करणाऱ्या जनतेला सन्मार्गावर आणण्याचे महत्तम कार्य संघातील सर्व घटकांनी मोठ्या तळमळीने केले. यासाठी त्यांना अनेक आपत्तीशी झगडा द्यावा लागला, पण मानवकल्याणाचेच नव्हे प्राणिमात्राच्या कल्याणाचे एक ध्येयच त्यांच्या नजरेसमोर असल्याने कोणत्याच विपत्तीची त्यांनी पर्वा केली नाही.

यावेळी भ. महावीरांचा निर्वाण्काल जवळ आल्याने समवसरणाचे विसर्जन झाले होते आणि भ. महावीर पावापुरीच्या मनोहर बागेतील तलावाजवळ एका लहानशा जागेत बसले होते.

अखेर निर्वाणाचा दिवस उजाडला. आश्विन अमावस्येची ती पहाटेची वेळ होती. भ . महावीरांनी योगनिराध करुन शेष चार अघाति कर्माचा नाश केला. त्यांचा आत्मा जड शरीराला सोडून ऊर्ध्वगामी बनला आणि लोकाकाशाच्या अग्रभागी सिध्दशिलेवर जाऊन स्थिरावला.

हजारो भक्त त्यांच्या अंतिम दर्शनासाठी आले. आपल्या हयातीत महावीरांनी सध्दर्माचा उपदेश देऊन आज ते मुक्तिपदास पोहोचले होते. त्यांच्या या गमनालाच जैन परिभाषेत निर्वाण, महानिर्वाण असे म्हणतात. त्याचा अर्थ आहे. आत्म्याची परिपूर्ण शांति. आत्म्यानं जन्ममृत्यूवर मिळविलेला कायमचा विजय. निर्वाण म्हणजे अक्षय नि अजरामर पदाची प्राप्ति . हाच तो मोक्ष !

भ. महावीर मोक्षास गेले त्यावेळी कृष्ण पक्षाची अमावास्या असून देखील सर्वत्र प्रकाश पसरला होता. सर्वाना त्यांच्या महानिर्वाणाची कल्पना आली. समुद्र गर्जू लागला. देवलोकांतील घंटा आपोआप वाजू लागल्या त्यामुळे लगेच इंद्र आपल्या अनेक सहकारी देदेवतासह तेथे आला. हरिचंदन, कापूर आदि उत्कृष्ट शरीराला नमस्कार करुन इंद्राने ते चितेवर ठेवले. अग्निकुमार देवांनी चितेला नमस्कार केला. चिता पेटली. वायुकुमारांनी नमस्कार केला. चिता भडकली. सर्व देव मोठमोठ्याने जयजयकार करीत चितेला प्रदक्षिण घालू लागले. अखेर चितेची राख झाली. सर्वानीच ती राख माठ्या भक्तीने आणि अत्साहाने आपपल्या मस्तकावर धारण केली. देव देखील त्या रक्षेलाच मोठे ऐश्वर्य समजून मस्तकावर धारण करुन मोठ्या आनंदाने जयजयकार करीत स्वर्गात निघून गेले. राखेचा एक कण देखील शिल्लक नाही.

आणि त्याच दिवशी रात्री महापंडित इंद्रभूती गौतमगणधरांना केवलज्ञान प्रकट झाले. विश्वज्ञ ाानी भ. महावीरांना मोक्षलक्ष्मीची व त्यांच्या प्रथम गणधरांना-इंद्रभूतींना ज्ञानलक्ष्मीची प्राप्ति झाली. जनतेला अपार आनंद झाला. त्यांचा या आनंद व हर्षाचा प्रकाश त्यांच्या कृतीतून प्रकट झाला. घरोघर दीप पाजळले गेले. रस्तोरस्ती दीप तेजाळले गेले. जिकडे तिकउे दीपच दीप दिसू लागले. भक्त गाऊ लागले . नमःश्री वर्धमानाय चा जयघोष दाही दिशतून घुमू लागला. या अविस्मरणीय आनंदाला नाव देण्यात आलं दीपावली त्या दिवसाला नाव मिळालं दिवाळी आनंदाची दिवाळी , ज्ञानाची दिवाळी , मोक्षसुखाची दिवाळी, भ. महावीरांच्या निर्वाणाची दिवाळी अमावस्या असून देखील त्यावेळी जगभर पसरलेल्या उधोताचे प्रतीक-स्मृतिचिन्ह म्हणून आज तागायत सामान्य जनता या दिवशी दिव्याच्या ज्योती उजाळून हा आगळा आनंदमहोत्सवी सण अखंड साजरा करीत आली आहे. अखंउ साजरा करीत राहणांर आहे.

## प्रास्ताविक

'इतिहास' या शब्दाची साधी व सर्वमान्य व्याख्या 'इति+ह+आस' ( जसे घडले तसे) अशी केली जात असली तरी व्याख्येशी प्रामाणिकपणे राहून एका क्षणाचाही इतिहास लिहिणे कोणासही अशक्यच आहे. म्हणूनच इतिहासकार इतिहासलेखन करीत असताना प्रदेशाच्या, काळाच्या, धर्माच्या मानववंश गटाच्या विशिष्ट मर्यादा घालून घेऊनच इतिहासलेखन करीत असतो. अर्थात् या मार्यादा स्वीकारुनही प्रामाणिकपणे व वस्तुस्थितीनिष्ट लिहिलेला 'इतिहास' हा इतिहास य संज्ञेला पात्र ठरण्यास कोणतीच आडकाठी नसावी.

भारतात स्वातंत्र्यपूर्व व स्वावंत्र्योत्तर काळात विशिष्ट प्रदेशाचे, विशिष्ट धर्माचे, विशिष्ट काळाचे इतिहास लेखन मोठ्या प्रमाणावर झाले आहे. भांडारकर, राजवाडे, अळतेकर, इत्यादि भारतीय इतिहासकाराबरोबर डॉ. स्मिथ, डॉ. मार्शल इत्यादि अनेक परकीय इतिहासकारांनी भरतीय इतिहास प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यत लिहिण्याचे असामान्य कष्ट घेतले आहेत. डॉ. सांकलियासारख्या विव्दानांनी आपल्या प्रदीर्घ कष्टांनी भारतीय प्रागैतिहासाचे दालनही अभ्यासपूर्वक परिपूर्ण करण्याचे कष्ट घेतलेले दिसतात. सामान्यतः भारतात एवढ्या मोठ्या प्रमाणावर इतिहास लेखन झालेले असताना. व होत असताना 'या इतिहासखंडाची' आवश्यकता वाचकासमोर मांडणे आवश्यक आहे.

कोणत्याही देशाचा, धर्माचा इतिहास लिहित असताना तत्काळापर्यतच्या सर्वागीण ऐतिहासिक साधनांचा उपयोग करणे आवश्यक असते. ऐतिहासिक साधनामध्ये सामान्यतः उत्खननात मिळालेल्या वस्तू, वास्तू, शिलालेख, ताम्रपट , नाणी , धार्मिक व लौकिक वाङ्मय, परकीय प्रवाशांची प्रवासवृत्ते, इतिवृत्ते इत्यादींचा समावेश होतो. उपलब्ध साधनांच्या सहाय्यानी प्रमाणित इतिहासलेखन करणे, कोणत्याही भावनांच्या, विचारांच्या किंवा श्रध्देच्या दडपणाखली इतिहासलेखन न करणे हे इतिहास लेखकाचे आद्यकर्तव्य असते. ही जाणीवच काही प्रमाणात या 'इतिहासखंडाच्या' लेखनाला कारणीभूत झालेली आहे.

स्वातंत्र्यपूर्व किंवा स्वातंत्र्योत्तर काळातील इतिहास-लेखनात दोन विशिष्ट प्रकारचे मार्ग आढळतात. काही ग्रंथामधून विशिष्ट हेतु मनात बाळगूनच इतिहासलेखन करावयास घेतलेले असल्याने आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ पुरावेच फक्त विचारात घेतलेले दिसतात. इतकेच नव्हे तर विरुध्द बाजूच्या स्पष्टपणे दिसणाऱ्या आलेखासारख्या साधनातही साशंकता व्यक्त करुन ते पुरावे दूर सारण्याची या ठिकाणी प्रवृत्ति दिसते. सामान्यतः भारतीय इतिहासाचे लेखन करताना भरतातच उदयास आलेल्या व विकास झालेल्या व कायम स्वरुपात चिरकाल टिकलेल्या 'जैन धर्माकडे' दुर्लक्ष करुन चालणारच नाही. त्याशिवाय निदान धर्माच्या इतिहासात तरी ते सर्वागीण भारताचे चित्र होणार नाही. तथापि कित्येकदा ऐतिहासिक ग्रंथामधून या धर्माच्या इतिहासाकडे द्यावयास हवे तेवढे लक्ष दिलेले दिसत नाही किंवा काही वेळा त्या धर्माच्या अस्तित्वाकडे , ऐतिहासिक साधनाकडे हेतुपुरस्सर दुर्लक्षही करण्यात येते. अगदीच अशक्य झाल्यास साधनाबद्दल साशंकता व्यक्त करुन ठेवण्यात येते. अशा प्रकारचे इतिहासलेखन म्हणजे इतिहासाशीच अप्रामाणिकपणा होय. या उलट काही वेळा फक्त 'जैन धर्माचा' च इतिहास सांगणारे इतिहासग्रंथ आढळतात. हे ग्रंथ धार्मिकविचारांचा पगडा मनावर ठेवूनच लिहावयास घेतलेले असल्याने किंवा विशिष्ट धर्माचे विशिष्ट महत्व स्पष्ट करायचेच या विचारांची बैठक तयार करुनच लिहावयास घेतलेले असल्याने कित्येकदा ते 'इतिहासा' शी प्रामाणिक राहू शकत नाहीत. योग्य व प्रामाणिक इतिहास-लेखनाच्या दृष्टीने हे दोन्हीही मार्ग अयोग्य असून सुवर्णमध्य काढणे आवश्यक आहे. अर्थात् या दोषाला काही प्रमाणात जैनसमाजही कारणीभूत आहे. आपल्या वाङ्मयाचा, धर्मग्रंथांचा समाजात योग्य आदर होईल किंवा नाही याबद्दलच साशंकता त्यांना वाटत असल्याने या समाजाने आपले ऐतिहासिकदृष्ट्या मौल्यावान ग्रंथ कित्येक दिवस मंदिराच्या बाहेरच येऊ दिले नाहीत. म्हणूनच महाभारतासारख्या धार्मिक ग्रंथातील माहिती संबंधानी आजपर्यत अनेक दृष्टीने अनेक प्रकारांनी वैचारिक लेखन, संशोधन झाले पण आदिपुराणासख्या जैन महाकाव्यावर अजूनही त्याप्रमाणात प्रकाश पडलेला दिसत नाही.

स्वातंत्र्य काळात याबाबतीत मोठी सुधारणा झाल्याने अनेक ऐतिहासिकदृष्ट्या मौल्यवान ग्रंथ छापून समाजासमोर आलेले दिसतात. महाराष्ट्र व भारतात अनेक संस्थांनी व विव्दानांनी केलेल्या उत्खननामुळे अनेक मौल्यावान इतिहास साधने प्रकाशात येत आहेत. ठिकठिकाणच्या संशोधनामुळे व जैनसंशोधनसंस्थांच्या कार्यामुळे आलेखासारखी अनेक मौल्यवान इतिहास साधने समाजाबरेबर मांडली जात आहेत. त्यामुळेच आधुनिक काळात इतिहास-लेखन करताना या साधनांचा उपयोग करणे अपरिहार्य, अनिवार्य आहे. या दृष्टीकोनातूनच व त्याच्या सहाय्यानेच इतिहास लेखन करणे हा या खंडाचा प्रपंच आहे.

इतिहास खंडाचे लेखन करताना, निरनिराळ्या आलेखांचा, कलेचा साधन म्हणून उपयोग केला आहे. काही ठिकाणी इतर विव्दानांच्या मतांचाही आढावा घेतला आहे. तर काही ठिकाणी तत्कालीन इतर सामाजिक संस्था, धर्म , समाजघटक यांच्याशी तुलनाही केलेली आहे. सामान्यतः विशिष्ट काळात मिळणाऱ्या विशिष्ट वस्तूंवरुन, साधनांच्या पुराव्यावरुन त्या सत्ताधीशाचा या धर्माकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचेही निरीक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् हा सर्वाग परिपूर्ण इतिहास आहे असा दावा मुळीच नाही. याउलट कित्येकदा प्रस्थापित इतिहास न देता साधनांच्या मदतीने सत्ताधीशांचा दृष्टिकोन तपासण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. मुघल घराण्यातील राजांच्या कार्याची माहिती न देता त्या काळातील आलेख, वाङ्मय, जैन समाज जीवन यांच्या सहाय्याने मुघल सत्ताधीशांचा या धर्माकडे पाहण्याचा दुष्टीकोनच तपासण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् हा इतिहास ख्यांड म्हणजे संशोधन मुळीच नव्हे. उपलब्ध साधनांमधून जैनधर्म व समाजाचा प्रयत्न केला. अर्थात् हा सांगण्याचा हा एक प्रयत्न आहे. भारतीय इतिहास लिहिताना निदान पुढील काळात तरी या ऐतिहासिक साधनानी सिध्द होणाऱ्या जैन धर्माच्या सर्वागीण अस्तित्वाकडे व महत्वाकडे इतिहास लेखकाचे दुर्लक्ष होऊ नये एवढीच नम्र अपेक्षा या प्रयत्नामागे आहे.

# - कालपरंपरा -

उत्तरेला सुविस्तृत, उत्तुंग हिमालयाच्या पर्वतराशीनी संरक्षित, दक्षिणेला तीन महासागरांनी वेष्टित व मध्माभागी विंध्यपर्वतानी "उत्तरपथ व दक्षिणपथ" या दोन विशाल पर्वतांनी विभाजित असलेल्या या त्रिकोणाकार महादेशाचे प्राचीन उपलब्ध नाव "अजनाभ" होते. त्यानंतर हा प्रदेश भारतवर्ष. नावाने प्रसिध्द झाला. विशेषतः उत्तरपथला आर्यावर्त संज्ञा आहे. गंगा व यमुनांनी युक्त असलेल्या प्रदेशाला मध्यदेशाला मध्यदेश म्हणतात. या प्रदेशातच भारतीय धर्म, दर्शन, ज्ञान व विज्ञान आविष्कृत व विकसित झाले. या प्रदेशाचे आध्यात्मिक, बौध्दिक इतकेच नव्हे तर राजकीय नेतृत्वही चिरकाल सर्व भारतीय व भारताबाहेरील प्रदेशात फैलावत राहिले. जल, स्थल, जीवजंतु व वनस्पति, खनिज व कृषि उत्पादन इत्यादि बाबतीत या देशात जितकी विविधता आहे. तथापि इतकी विविधता व विषमतेचे आगर असूनही भारतवर्षाची सांस्कृतिक एकतेनें राजकीय एकतेला प्रेरणा दिली आहे. चक्रवर्ती सर्माटाचा आदर्श या सत्याचे धोतक आहे. प्रत्येक महान् राजा चक्रवर्तिपद प्राप्त करण्याची अभिलाषा ठेवतो व आपल्या दिग्विजयाव्दारे संपूर्ण देशाला राजनैतिक एकसुत्रात बांधण्याचा प्रयत्न करतो. भारतीय महासागराच्या मध्याभागी असल्याने व भारतीय संस्कृति व सभ्यतेची शीघ्र प्रगति झाल्याने इतिहासाच्या प्रायः उदयकाळापासूनच तिने आपले शेजारी देश, दूरस्थ देश व तेथील समाज यांच्याबरोबर व्यापारी व सांस्कृतिक संबंध अविच्छिन्नपणे प्रस्थापित केले. अफगाणिस्थान तर भारताचा भागच होता. पण त्याचबरोबर पूर्व इतिहास काळापासूनच ईराण, मध्य अशिया, चीन, नेपाळ, तिबेट इत्यादी देशात, व्यापारासाठी जाणारे निरनिराळे सामाजिक गट, संपत्ति व राजकीय सत्ता मिळविण्याच्या अपेक्षने जाताना दिसतात.

मानव भेदाची विविधता व विभिन्न मानव जातीचे मिश्रण भारतातच आढळते. प्रामुख्याने ऋक्ष, भक्ष नाग इत्यादींच्या वंशजाचा द्रविड नावाने ओळखला जाणरा गट व उत्तर-पश्चिमेकडे उदयाला आलेला इंडोआर्यन म्हणून ओळखला जाणारा आर्याचा मानव गट आढळतो. या शिवाय आस्ट्रेलायड, अंगोलाइड, ईराणी, शक, पल्लव, कुषाण , हूण, अरब, तुर्क इत्यादी जातीचेही मिश्रण येथील समाजात झाले आहे.

पृथ्वीच्या प्रांरंभासंबंधी शाश्वतवादी व सृष्टिवादी विचार परंपरा आहेत. शाश्वतवादींच्या मते सत्‌चा कधी विनाश होत नाही व असत्‌चा उत्पाद होत नाही. विश्वरचना, त्यात अंतर्गत पृथ्वीमंडळ व त्यावर राहणाऱ्या मानव प्राण्याची परंपरा अनादि व अनंत आहे. अकस्मात् उदय वा क्षय असंभव आहे. द्रव्य, क्षेत्र , काल भावनुसार पदार्थाचे सदैव परिणाम होते. या परिवर्तनाची एखादी सामूहिक अवस्था विशेष आत्यंतिक होते, त्यालाच सृष्टी व प्रलय ही नावे देण्यात येतात. सृष्टिवाधांच्या मते ईश्वर ही अभिहित शक्ति आपल्या इच्छेने शून्यातून विश्व पृथ्वीमंडळ , मानवाची निर्मिती करते, क्षय करते.

# जैनांचे कालविषयक विचार

आधुनिक वैज्ञानिक पृथ्वीची पहिली अवस्था निर्जीव युगाची मानतात, त्यानंतर जीव युगाचा प्रारंभ होतो. जीव युगाचे, पुरातन जीव युग, मध्य जीव युग व नव जीव युग असे तीन भाग मानतात , जैन परंपरेनुसार काळाचे केलेले वर्णन भूतात्विक काळाशी जुळणारे आहे.

जैन शासनाच्या मतानुसार अनन्तरुप अतीतकाळ, अनंत गुणित अनागत काळ व समयादिक वर्तमान काळ असे काळाचे तीन प्रकार करण्यात येतात. व्यवहार काळाचे उत्सर्पिणी व अवसर्पिणी असे दोन विभाग करण्यात येतात. या दोन्हींना मिळून कल्पकाळ म्हणतात व या दोन्हींचे मिळून वीस कोटाकोटी सागर प्रमाण म्हणजे एक कल्पकाळ होय . सुषमसुषमा, सुषमा, सुषमादु:षमा, दुषमसुषमा, दु:षमा, अतिदु:षमा हे अवसर्पिणी काळाचे सहा भेद आहेत त्याच्याबरोबर उलट अतिदु:षमा, सुषमदुषमा,सुषमा,सुषमसुषमा हे उत्सर्पिणी काळाचे सहा विभाग आहेत.

अवसर्पिणी काळातील सुषमसुषमा नावाचा जो प्रथम काळ आहे तो चार कोटाकोटी सागर प्रमाण मानला जातो. यात उत्तम भोगभूतीची प्रवृत्ती असते. या युगातील स्त्री-पुरुष ६००० धनुष्याच्या उंचीचे व तीन पल्योपम आयुर्मर्यादा असलेले व तीन दिवसानंतर बोरीच्या फळासमान आहार घेणारे असतात. त्यांच्या

शरीराची कांती बाल सूर्याप्रमाणे असते. समचतुरस्त्र संस्थान, वज्रवृषभनाराच संहनन व ३२ शुभ लक्षणांनी ते युक्त असतात. मार्दव, आर्जव गुणांनी ते युक्त असून ते सत्य सुकोमल व सुभाषी असतात. त्यांची बोली मधुर वीणेच्या समान असते. ते ९००० हजार हत्तींच्या समान बलवान असतात. क्रोध, लोभ, मद, मत्सर व मान या सर्व दोषापसून ते रहित असतात. सहज, शारीरिक व आगंतुक ही तीन दुःखे त्यांना नसतात. संगीत इत्यादी विद्यांमध्ये ते प्रवीण असतात. ते सुंदर रुप असलेले असतात. उपशमादि सम्यक्त्वधारण करणारे असून, अनपवर्ति आयुष्यवान असतात. रोग, शोक, खेद, भाऊ-बहिण विकल्प इत्यादि रहित असतात. परस्परात दंपत्ति भाव ठोवून ते प्रेमपूर्वक आचरण करतात. संकल्पाप्रमाणे किंवा अपेक्षेप्रमाणे उपभोग वस्तू देणाऱ्या दहा प्रकाराच्या कल्पवृक्षांकडून उपभोग्य वस्तू घेऊन ते आपले आयुष्य व्यतीत करीत असतात. करीत असतात. जेव्हा आपल्या आयुष्यातील नऊ महिन्याचा काळ शेष राहतो तेव्हा ते युगल एक वेळ गर्भधारणा करुन आपल्या आयुष्यातील सहा महिन्याचा काळ राहिला असताना देवाचा बंध करुन मरणाच्या वेळी दोघेही स्वर्गात देव देवी होतात. जे सम्यग्दृष्टि जीव असतात, ते सर्व सौधर्मादि स्वर्गात तर मिथ्यादृष्टि जी भवनत्रिक ( भवन- व्यंतर -ज्योतिषवासी ) मध्ये जाऊन निर्माण होतात. येथे युगलांनी सोडून दिलेले शरीर ताबडतोब विरघळून जाते. या युगलांनी उत्पन्न केलेली स्त्री - पुरुषांची जोडी तीन दिवस आंगठा चोखूनच राहते. पुढील तीन दिवसात ते रांगू लागतात. नंतरच्या तीन दिवसात त्यांचे मन स्थिर होते. पुढील तीन दिवसात त्यांना यौवन प्राप्त होते व त्यापुढील तीन तीन दिवसात ते अनुक्रमे कथा ऐकणारे व सम्यक्त्व ग्रहण करण्यायोग्य होतात. अशा रीतीने २१ दिवसात ते युगल संपूर्ण कलासंपन्न बनतात.

या काळातील भुमि रज, धूम, अग्नि, थंडी, बर्फ , विंचवासारखे प्राणी इत्यादींनी रहित होती. ती भूमि निंदीत द्रव रहित असून तन, मन, नयन इत्यादींना सुख देणारी, निर्मल आरशासमान होती. फळाफुलांनी भरलेले वृक्ष , कमलानी भरलेली तळी, सुंदर भवन, कल्पवृक्षांनी परिपूर्ण पर्वत, रत्नांनी भरलेली पृथ्वी, सुंदर नद्या हीया काळाची वैशिष्ठ्ये होत. नोकर-मालक भावना व युध्द विकलेद्रिय जीव, दिवस-रात्र भेद, शीत-उष्ण इत्यादी वेदना, परस्त्री, परधन हरण इत्यादींचा येथे अभाव होता. येथे मनुष्य जोडीजोडीनेच उत्पन्न होई . अनुपम लावण्यानी परिपूर्ण, सुखसागरात मग्न , मार्दव व आर्जव सहित, सुशील मनुष्य भोगभुमीत असतात. नर नारी शिवाय परिवार नसे, सर्वत्र कल्पवृक्ष असत. भोगभूमीत युगल अनेक प्रकारचे भोग उपभोगीत असत. मुकूट इत्यादी अभुशणे त्यांना प्रथमपासूनच होती. भोगभुमीत मनुष्याचे नऊ महिने आयुष्य राहिले असताना गर्भ राहात असे व नऊ महिन्यानंतर बाल-बालिका युगल जन्म घेत असत व तत्काळ माता पित्यांना मृत्यू येई. पुरुषाला शिंकेने व स्त्रीला जांभईने मृत्यू येई व तात्काळ त्यांचे शरीर ढगाप्रमाणृ विरुन जाई .

१) उत्पन्न झालेल्या बालकांचे शय्येवर झोपून अंगठा चोखण्यात तीन दिवस व्यतीत होत. त्यानंतर उपवेशन, अस्थिरगमन,स्थिरगमन, कलागुणांची प्राप्ती, तारुण्य, सम्यग्दर्शनाच्या ग्रहणाची योग्यता. या प्रत्येक अवस्थेत बालकांना तीन दिवस व्यतीत करावे लागत. त्यांच्या शरीरात मूत्र व विष्ठेची उत्पत्ति होत नाही. ते अक्षर, चित्र, गणित, गांधर्व, शिल्प इत्यादी ६४ कलांमध्ये स्तभावतः निपुण असतात. भोगभूमीत गाय, सिंह, हत्ती, मगर, डुक्कर, अस्वल, म्हैस, माकड , वाघ, कोंबडा, पोपट, कबुतर, राजहंस इत्यादी तिर्यच प्राणी असतात. हे युगल पारस्परिक प्रेमाने आसक्त असतात. मनुष्याप्रमाणे तिर्यंचही आपापल्या योग्यतेनुसार मांसाहारशिवाय कल्पवृक्षाचा उपभोग घेत असत. चौथ्या दिवशी बोरा एवढा आहार घेत असत.

चार कोटाकोटी सागरोपम प्रमाण असलेल्या सुषमसुषमा काळातच पहिल्यापासून शरीराची उंची, आयुष्य, बळ , ऋध्दि व तेज इत्यादि कमी कमी होत जाते.

२) 'सुषमा' :- उत्सेधादिकाच्या कमीकमी होण्यामुळे सुषमा नावाचा दुसराकाळ प्रविष्ठ होतो. हा तीन कोटाकोटी सागरोपम समान काळ होय. या काळात उत्तम भोगभूमिवत् मनुष्य व तिर्यच प्राणी असतात. या काळात निर्माण झालेली बालके शय्येवर झोपून आंगठा चोखण्यात पाच दिवस व्यतीत करतात. त्यानंतर उपवेशन , अस्थिरगमन, स्थिरगमन, कलागुणप्राप्ति, तारुण्य व सम्यक्त्व ग्रहणाची योग्यता, यातील प्रत्येक अवस्थेत त्या बालकांना पाच पाच दिवस व्यतीत करावे लागतात. बाकी सर्वागिण स्थिती सुषमासुषमा काळाप्रमाणेच असते.